पुस्तिका क्र. १

माहितीचा अधिकार कायद्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि महत्त्वाच्या संकल्पना

दूरशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम

सार्वजनिक धोरण केंद्र

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी

राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे – ४११ ००७

CCRTI

अनुक्रमणिका

अ. क्र.	तपशील	पृष्ठ क्र.
१.	माहितीचा अधिकार कायद्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी..................	०१
१.१	गुप्ततेची परंपरा..........................	२
१.२	आंतरराष्ट्रीय संदर्भ....................................	०३
१.३	राष्ट्रीय संदर्भ....................................	०७
१.४	काही महत्त्वाचे न्यायनिवाडे......................	०७
१.५	कायदा निर्मितीसाठी अन्य काही प्रयत्न.............	१४
१.६	माहिती अधिकाराची मूलतत्त्वे	
१.७	माहिती अधिकार कायद्याची ठळक वैशिष्टये	
१.८	महत्त्वाच्या संकल्पना	

भाग-१
या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्ही...

१. माहिती अधिकारपूर्व प्रशासनाची गुप्ततावादी मानसिकता स्पष्ट करू शकाल.

२. माहिती अधिकारामागील आंतरराष्ट्रीय घडामोडींचे वर्णन करू शकाल.

३. माहितीचा अधिकार आणण्यामध्ये भारतीय न्यायालयांची भूमिका व महत्त्वाचे न्यायनिवाडे यांचे वर्णन करू शकाल.

४. माहितीचा अधिकार आणण्यामध्ये स्वयंसेवी संस्थांनी/ नागरी संघटनांनी केलेल्या कार्याचे वर्णन करू शकाल.

५. माहितीचा अधिकार कायदा निर्मितीमागील विविध घटनांच्या तपशीलाचे वर्णन करू शकाल.

६. माहिती अधिकाराची मूलतत्वे, ठळक वैशिष्टये व महत्वाच्या

१. माहितीच्या अधिकाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी : एक दृष्टिक्षेप

काही अल्प लोकांच्या हाती सत्ता देऊन स्वराज्य साकार होणार नाही, तर जेव्हा सत्तेच्या दुरुपयोगाला विरोध करण्याचे सामर्थ्य सर्व जनतेमध्ये येईल तेव्हाच खरे स्वराज्य साकार होईल.

महात्मा ग़ांधी

प्रास्ताविक :

भारतीय नागरिकांना मिळालेला माहितीचा अधिकार हा सहज मिळालेला नाही. माहितीचा अधिकार मिळण्याचा प्रवास अनेक व्यावहारिक अडथळ्यांनी भरलेला होता. ब्रिटिश शासनातील कायद्याचे राज्य, नियमबद्ध नोकरशाही व स्वतंत्र न्यायपालिका यांचा वारसा भारतीय प्रशासनाला जरी मिळाला असला तरी, ब्रिटिश शासनाप्रमाणेच भारतीय प्रशासन जनतेपासून दूरच राहिले.

१९४६ मधील संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासूनच जगभरात सजग, माहितगार नागरिक असलेला गुणवत्ताप्रधान समाज निर्माण करण्याच्या दिशेने धोरण आखणीला सुरुवात झाली. या दृष्टीने जगभर प्रयत्न चालू आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाबरोबरच युरोपियन युनियन, राष्ट्रकुल मंडळ, युनिस्को, वसुंधरा परिषद, यासारख्या संस्थांबरोबरच जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यासारख्या वित्तीय संस्थांनी माहितीच्या अधिकाराचे आंतरराष्ट्रीय धोरण आखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

भारतामध्ये माहितीचा अधिकार राज्यघटनेच्या कलम १९(१)(क) मधील भाषण व अभिव्यक्तिस्वातंत्र्यातच असल्याचा निर्वाळा वेळोवेळी भारतीय न्यायालयांनी दिला आहे. तर सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्था, संघटनांनी सामजिक न्यायाची अंमलबजावणी करण्यासाठी माहितीचा अधिकार आवश्यक मानला.

एकूणच, शासनाने आंतरराष्ट्रीय धोरणे, न्यायालयांचे निर्णय व नागरी संघटनांचा वाढता दबाव यांच्यामुळे या कायद्याच्या निर्मितीला गती दिली. परिणामस्वरूप माहितीचा अधिकार कायदा अस्तित्वात आला. भारतातील माहितीचा अधिकार कायद्याच्या निर्मितीची प्रक्रिया वरील सर्व बाबी समोर ठेवून आपल्याला समजून घ्यावी लागते.

१.१ गुप्ततेची परंपरा

भारतीय प्रशासनाला गुप्ततेची परंपरा आहे. शासकीय गुपितांचा कायदा, १९२३ हा मुख्यतः संरक्षण यंत्रणेतील महत्त्वाची स्थळे आणि देशाच्या सुरक्षिततेशी निगडीत असणारी माहिती देण्यावर असणाऱ्या निर्बंधाबाबतचा कायदा आहे. परंतु देशाच्या किंवा एखाद्या व्यक्तीच्या सुरक्षेशी ज्याचा संबंध नाही अशा सर्वच माहितीला हा कायदा लागू आहे, असा समज जवळपास सर्वत्र रुढ करण्यात आला. ज्या माहितीच्या प्रकटीकरणामुळे सार्वजनिक हिताला धोका पोहचणार नाही, अशा माहितीलाही हा कायदा सर्रास लावला गेला. लोकशाही राज्य कारभाराची व कल्याणकारी राज्यव्यवस्थेची सर्व प्रकारची माहिती अशीच गोपनीयतेच्या वलयात अडकून राहिली आणि भारत देश स्वतंत्र झाल्यानंतरही ब्रिटीशांनी सुरू केलेली प्रशासनाची वसाहतवादी चौकट व गोपनीयतेची मानसिकता बहुतांश क्षेत्रात कायम राहिली.

भारतीय पुराव्याचा कायदा, १८७२, केंद्रीय नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९६४ अशा कायद्यातील व नियमांतील जटिलतेचा प्रशासनाभोवतीचा विळखा कायम राहिला. यातूनच लोकशाहीबाबत सिद्धान्त व व्यवहार यामध्ये अंतर निर्माण झाले आणि प्रतिकात्मक लोकशाहीचा अंमल सुरू झाला. भ्रष्ट सार्वजनिक जीवन, उदासीन व हतबल नागरिक, प्रचंड विषमता व दारिद्र्य, यामुळे अर्थहीन वाटणारे राजकीय स्वातंत्र्य या सर्व बाबींवर चर्चा ब-याच काळापासून चालू आहे.

गोपनीयतेच्या संस्कृतीला छेद देऊन माहितीचे खुले प्रवाह सुरू ठेवणे, लोकशाही राज्यव्यवस्थेसाठी आवश्यक असल्याचे सर्वांना आता पटले आहे. त्यामुळेच माहितीचा अधिकाराचा कायदा, २००५ संमत करण्यात आला. हा एकमेव कायदा आहे, ज्याच्या आधारे जनता प्रशासनावर लक्ष ठेवू शकते. माहितीचा अधिकार अन्न, वस्त्र, निवारा यांप्रमाणे राज्यघटनेतील मूलभूत अधिकार म्हणून मान्य झाला आहे. गोपनीयतेच्या संस्कृतीला तिलांजली देऊन, माहिती देणे हा नियम व ती टाळणे हा अपवाद, असे

समीकरण कायदा करताना स्वीकारण्यात आले आहे. मूलतः सुधारणावादी असलेल्या कायद्यामुळे निष्क्रिय व सुप्त झालेल्या प्रशासनात बदल घडवता येईल.

माहितीच्या अधिकाराने माहितीच्या लोकशाहीचे नवे पर्व सुरु केले आहे. यालाच सुराज्याच्या दिशेने जाणारे दुसरे स्वातंत्र्य असेही म्हटले जाते. घटनात्मक मूलभूत हक्क असणारा माहितीचा अधिकार मिळवण्याचा, संघर्षमय व रोमांचक कालखंड संपला आहे आणि कायद्याच्या अंमलबजावणीचा व त्यातील व्यावहारिक अडथळ्यांचा, आव्हानात्मक कालखंड सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार कायद्याच्या इतिहासाचा वेध घेणे आवश्यक आहे. या कायद्याचा खरा अर्थ समजून घ्यायचा असेल तर प्रथम महात्मा गांधींचे ग्राहकाच्या संदर्भातील खालील उद्गार नागरिकांच्या संदर्भात किती अर्थपूर्ण आणि अंतर्मुख करणारे आहेत, हे लक्षात येईल.

महात्मा गांधीजींच्या नजरेतून **आपलेकडे येणारे नागरिक हे फार मोलाचे आहेत. नागरिक हे आपल्यासाठी नसून आपण त्यांच्यासाठी आहोत.** **नागरिक हे आपल्या कामामध्ये व्यत्यय नसून ते आपल्या कामाचा गाभा आहेत.** **नागरिक कोणी परके नसून, ते खऱ्या अर्थाने आपले आधारस्तंभ आहेत.** **त्यांना माहिती व कल्याणकारी सेवा पुरवून आपण उपकार करीत नाही.** **तर सेवा करण्याची संधी देऊन तेच आपल्या सर्वांना उपकृत करीत आहेत**	माहितीच्या अधिकारामुळे **पारदर्शकता, उत्तरदायित्व** व **लोकसहभाग** या शब्दांना नव्याने अर्थ प्राप्त झाला आहे. माहितीचा अधिकार कायदा हा गांधीजींची **'विश्वस्त'** ही संकल्पना स्वीकारतो. या संकल्पनेनुसार शासनकर्ते सार्वजनिक संस्थांमधील माहितीचे मालक नसून, ते केवळ विश्वस्त आहेत.

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–१

१. भारतीय प्रशासनामध्ये गोपनीयतेची मानसिकता निर्माण करण्यास कारणीभूत ठरलेल्या तीन कायद्यांची नावे सांगा.

२. भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या अनुच्छेदामध्ये माहितीचा अधिकार अंतर्भूत आहेत ते स्पष्ट करा.

३. माहिती अधिकाराचा कायदा यावा यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणा-या समाजघटकांची यादी करा.

१.२ आंतरराष्ट्रीय संदर्भ :

१९९० नंतर माहितीचा अधिकार कायद्याच्या निर्मिती प्रक्रियेला ख-या अर्थाने बळ मिळाले. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यासारख्या जागतिक वित्तसंस्थांनी धोरणात्मक पाऊल म्हणून वित्तपुरवठा करताना, शासकीय क्षेत्र भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी अधिक पारदर्शी बनविण्याची अट विकसनशील राष्ट्रांसमोर ठेवली. १९९० पर्यंत जगातल्या केवळ १३ देशांनी राष्ट्रीय स्तरावर असा कायदा लागू केला होता. त्यानंतर आशिया खंडात जपान, दक्षिण कोरियासह अनेक राष्ट्रांनी हा कायदा अंमलात आणला. परिणामी, आज ८५ पेक्षा जास्त देशांनी या कायद्याचा स्वीकार केला आहे. नव्वदीचे दशक माहितीच्या विस्फोटाचे दशक मानले जाते. प्रगल्भ लोकशाहीसाठी माहितीचे प्रवाह खुले असले पाहिजेत, हा विचार या काळात अधिकच स्पष्ट होत गेला आणि तो जगभर स्वीकारला गेला. या दशकामध्ये जगभर आंतरराष्ट्रीय धोरणांचा सकारात्मक परिणाम म्हणून, माहितीच्या अधिकारासंबंधीची प्रक्रिया अधिकच गतिमान झ ाली. माहितीच्या अधिकाराच्या कायद्याला केवळ प्रशासन सुधारण्याचा कायदा असे न मानता, सर्वत्र मूलभूत मानवी अधिकार म्हणून मान्यता मिळाली. दक्षिण अफ्रिकेमध्ये तर शासकीय क्षेत्राबरोबरच खासगी क्षेत्रही या कायद्याच्या चौकटीत यावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. लोकशाही विकासाच्या दृष्टीने अलीकडच्या काळातील या सर्वात महत्त्वाच्या घटना आहेत.

माहितीच्या अधिकाराचा आंतरराष्ट्रीय इतिहास पाहताना जगभर स्वीकारलेले महत्वाचे तत्त्व म्हणजे शासन व सर्व शासकीय संस्थांकडे असणारी माहिती ही सार्वजनिक स्वरूपाची असते, ती मागण्याचा व पाहण्याचा नागरिकांना अधिकार असतो आणि केवळ समर्थनीय कारणासाठीच ती राखून ठेवली जाऊ शकते. असा हा अधिकार स्वीकारण्यामध्ये स्वीडन हा देश सर्वात आघाडीवर असल्याचे दिसते. १७६६ मधे 'फ्रिडम ऑफ प्रेस ॲक्ट' असा कायदा करून स्वीडनमध्ये माहितीचा अधिकार सर्वप्रथम मान्य करण्यात आला. **संयुक्त राष्ट्रसंघाने** या कायद्याच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर

धोरणात्मक भूमिका बजावली आहे. आमसभेच्या पहिल्या अधिवेशनात १९४६ मध्ये 'युनिव्हर्सल डिक्लरेशन ऑफ ह्युमन राईट्स' मध्ये संमत केलेल्या ठरावात असे स्पष्ट केले आहे की, नागरिकांचे माहिती मिळवण्याचे स्वातंत्र्य हा मूलभूत मानवाधिकार असून, तो संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिलेल्या नागरिकांच्या स्वातंत्र्याची आधारशीला आहे.

मानवी हक्क जाहिरनाम्यातील अनुच्छेद १९

खुल्या अभिव्यक्तीसाठी जागतिक अभियान.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत मानवी हक्काचा वैश्विक जाहीरनामा (१९४६)

कलम १९ - प्रत्येकाला स्वत:चे मत बनविण्याचे आणि ते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्यामध्ये कोणत्याही दबावाशिवाय, कोणत्याही माध्यमातून आणि कोणत्याही सीमांशिवाय किंवा हस्तक्षेपाशिवाय मत बनविणे, माहिती मागणे, माहिती घेणे व माहिती देणे तसेच माहिती आणि कल्पनांचे आदानप्रदान करणे अभिप्रेत आहे.

स्वीडन नंतर डेन्मार्क, फिनलँड व नॉर्वे या देशांत माहितीचा अधिकार देणारे कायदे करण्यात आले. या स्कँडेव्हियन देशांमध्ये सुदृढ लोकशाही, पारदर्शी कारभार, भ्रष्टाचाराचे कमी प्रमाण याच्यामागे मूलतः त्यांनी माहितीच्या अधिकाराचा केलेला स्वीकार हा कारणीभूत आहे.

या कायद्याच्या स्वीकाराला ख-या अर्थाने गती मिळाली ती विसाव्या शतकाच्या उत्तरार्धानंतर. युरोपियन युनियनने पारदर्शकतेसाठी माहितीचा अधिकार अनिवार्य मानला. *'युरोपियन कन्व्हेन्शन फॉर द प्रोटेक्शन ऑफ ह्युमन राईटस् अँड फन्डामेंटल फ्रिडम, १९५०'* मध्ये प्रत्येक व्यक्तीचा अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार मान्य करण्यात आला. अमेरिकेने अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा हिरीरीने पुरस्कार केला असला तरी, वरील देशांच्या तुलनेत उशीरा म्हणजे, १९६६ मध्ये अमेरिकेत 'फ्रिडम ऑफ इनफर्मेशन ॲक्ट'चा स्वीकार करण्यात आला. ब्रिटनने १९६६ मध्ये माहितीच्या अधिकाराचा स्वीकार केला. १९७१ मध्ये

राष्ट्रकुल मंडळाने नागरिकांचा प्रशासनातील सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने माहितीच्या अधिकाराचा पुरस्कार केला. कॅनडा, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया यासारख्या राष्ट्रकुलातील देशांनीही सन १९८२ च्या दरम्यान या कायद्याचा स्वीकार केला. १९९९ मध्ये डर्बन (दक्षिण अफ्रिका) येथे झालेल्या परिषदेत माहितीच्या अधिकाराला स्वतंत्र न्यायिक अधिकाराच्या रूपात लागू करण्याची सूचना करण्यात आली. तसेच अभिलेख व्यवस्थापनासाठी उपयुक्त पावले उचलण्यात आली. राष्ट्रकुल सचिवालयाने एक मॉडेल बिलही तयार केले होते, जेणेकरून विविध देशांना माहितीच्या अधिकाराशी संबंधित कायदे करता यावेत. चीनसारख्या साम्यवादी देशानेही २८ डिसेंबर २००५ पासून 'द फ्रिडम ऑफ गव्हर्मेंट इन्फरमेशन लॉ' असा माहितीचा अधिकाराचा कायदा लागू केला. जगातील इतर देशातील या कायद्याच्या अंमलबजावणीच्या तुलनात्मक अध्ययनावरून असे दिसून येते की, बहुतांशी सर्व विकसित देशांनी या कायद्याचा स्वीकार केलेला आहे. सदृढ लोकशाही, शासनाच्या कामात नागरिकांचा सहभाग, पारदर्शक कारभार, शिक्षणाचे उच्च प्रमाण या सर्वांचा थेट संबंध माहितीच्या स्वातंत्र्याशी आहे, हे लक्षात येते.

दि. १६ डिसेंबर १९६६ मधील नागरी आणि राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यानुसार (इन्टरनॅशनल कॉव्हेनन्ट ऑफ सिव्हिल अँड पॉलिटिकल राईटस), नागरिकांच्या मत आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्यात, त्यांनी निवडलेल्या कोणत्याही माध्यमातून माहिती मागण्याचे, माहिती मिळवण्याचे आणि ती इतरांना देण्याचे स्वातंत्र्य सामावलेले आहे, असे मानण्यात आले. तसेच या करारनाम्यामध्ये माहिती अधिकाराचा वापर करणा-यांसाठी काही कर्तव्ये व जबाबदा-या निश्चित करण्यात आल्या. युनेस्कोने १९७८ मध्ये एक घोषणापत्र जाहीर केले व त्यानुसार अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि माहितीचा अधिकार यांना मूलभूत मानवाधिकार व मूलभूत स्वातंत्र्याचा अधिकार यांचा अविभाज्य भाग मानण्यात आले. माहितीच्या अधिकाराशिवाय, अभिव्यक्तिस्वातंत्र्याची कल्पनाच अपुरी मानण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघाने भ्रष्टाचाराविरुद्ध माहितीच्या अधिकाराला एक तात्त्विक चौकट उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

सन १९९० नंतर ही गोष्ट सर्वमान्य करण्यात आली आहे की, माहितीच्या प्रकटीकरणामुळे, कार्यालयांची कार्यक्षमता तसेच, जनहिताच्या दृष्टीने निर्णय घेण्याची क्षमता वाढते. जागतिक पर्यावरण चळवळी व माहितीच्या अधिकाराचाही संबंध आहे. पर्यावरणाच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराचा स्वीकार केल्यामुळे जनसहभाग व शाश्वत विकास यांना प्रोत्साहन मिळेल असे आता मानण्यात येते. १९९२ मध्ये ब्राझिल येथील ***'रियो डी जानोरो'*** येथे भरलेल्या वसुंधरा परिषदेमध्ये हे मानण्यात आले की, आपल्या परिसरात होणारे प्रदूषण व त्याच्यामुळे होणा-या नुकसानीची माहिती सर्वसामान्य नागरिकाला होणे आवश्यक आहे. १९९५ मध्ये सामाजिक विकासावर आयोजित करण्यात आलेल्या परिषदेमध्ये देखील वरील मताची पुष्टी करण्यात आली. १६ ते १८ नोव्हेंबर २००५ मध्ये ट्यूनिश येथे माहितगार समाजाच्या जागतिक संमेलनात माहितीच्या अधिकाराचा पुनरुच्चार करण्यात आला.

जागतिक पातळीवर माहितीच्या अधिकाराचा प्रश्न चर्चिला जाण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संघटना, माहितगार नागरिकांचे विविध कृतिगट, तसेच मानवाधिकाराच्या समर्थनार्थ चालविल्या जाणा-या चळवळी यांच्या आग्रही भूमिकाही महत्त्वाच्या ठरल्या आहेत. 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' ने देखील भ्रष्टाचारावर निर्बंध घालण्यासाठी माहितीच्या अधिकाराचे महत्त्व अधोरेखित केले.

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–२

१. माहितीचा अधिकार सर्वप्रथम कोणत्या देशामध्ये व कोणत्या वर्षी मान्य करण्यात आला?

२. संयुक्त राष्ट्रसंघाने कोणत्या वर्षी मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा प्रसिद्ध केला?

३. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने जाहीर केलेल्या मानवी हक्काच्या वैश्विक जाहीरनाम्यानुसार अभिव्यक्ती स्वातंत्र्यातच माहितीचा अधिकार अध्याहृत नाही, हे वाक्य सत्य आहे का?

४. माहिती अधिकाराचा स्वीकार केलेल्या विकसित देशांची नावे सांगा.

५. पर्यावरणाचा व माहितीच्या अधिकाराचा संबंध मान्य करणारी वसुंधरा परिषद कोठे भरवण्यात आली?

१.३ राष्ट्रीय संदर्भ

माहितीच्या अधिकाराचा देशातील उगम तपासताना भारतीय न्यायालयाच्या निर्णयांची एक मालिकाच आपल्यासमोर येते. राज्य घटनेतील कलम १९(१) (क) मध्ये भाषण आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्यघटनेतील तरतुदी व विविध कायद्यातील तरतुदींचा अर्थ लावण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम सर्वोच्च न्यायालय व विविध उच्च न्यायालये करतात. जेव्हा राज्यघटनेमधील मूलभूत अधिकारामध्येच अनेक अधिकार अंतर्भूत असतात. मात्र ते वरवर पाहता कळत नाहीत. कलम १९(१) (क) मधील भाषण आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्यामध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे आणि म्हणूनच माहितीचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे, असा अर्थ सर्वोच्च व उच्च न्यायालयांनी विविध न्यायनिर्णयात स्पष्ट केला. याशिवाय राज्य घटनेतील कलम २१ मधील जगण्याच्या स्वातंत्र्याचा अर्थ लावताना भारतीय न्यायालयांनी अनेक महत्त्वाच्या निवाड्यात मूलभूत अधिकारांचा विस्तार केला आणि माहितीचा अधिकार याच पध्दतीने मूलभूत अधिकारात समाविष्ट असल्याचे स्पष्ट केले आहे. म्हणूनच माहिती अधिकाराच्या कायद्याच्या इतिहासात नागरिकांच्या मूलभूत हक्काचे रक्षण करणा-या न्यायव्यवस्थेचा सर्वात महत्त्वाचा सहभाग आहे.

१.४ काही महत्वाचे न्यायनिवाडे

राज्य घटनेच्या १९(१) (क) व्या कलमात नमूद असलेले भाषण आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य म्हणजेच घटनादत्त माहितीचा अधिकार आहे, असे स्पष्ट करून माहितीचा अधिकार हा भाषण आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्यातच अंतर्भूत आहे, असे न्यायमूर्तींनी आपल्या अनेक न्यायनिवाडयात म्हटले आहे.

माहितीचा अधिकार कायदा, २००५ च्या इतिहासातील महत्त्वाचे न्यायनिवाडे		
अ.क्र.	**तपशील**	**दिनांक**
१.	बेनेट कोलमन विरूध्द युनियन ऑफ इंडिया	ए.आय.आर., १९७३, सर्वोच्च न्यायालय ६०
२.	उत्तर प्रदेश विरूध्द राज नारायण व इतर	१९७५ (००४) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०४२८
३.	मनेका गांधी विरुध्द युनियन ऑफ़ इंडिया	(१९७८ ए.आय.आर. ५९७, १९७८ सुप्रीम कोर्ट रिपोर्टर (२) ६२१)
४.	श्रीमती प्रभा दत्त विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर	१९८२ (००१) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०००१
५.	एस. पी. गुप्ता विरुध्द युनियन ऑफ़ इंडिया	ए.आय.आर. १९८२ सर्वोच्च न्यायालय (१४९),
६.	इंडियन एक्स्प्रेस न्यूजपेपर्स प्रा. लि. व इतर विरुध्द युनियन ऑफ़ इंडिया व इतर	१९८५ (००१) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०६४१
७.	शीला बारसे विरूध्द महाराष्ट्र शासन	१९८७ (००४) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०३७३
८.	रिलायंस पेट्रोकेमिकल्स लिमिटेड विरुध्द प्रोप्रायटर्स ऑफ़ इंडियन एक्स्प्रेस न्युजपेपर्स प्रा. लि. व इतर	(१९८८ (००४) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०५९२)
९.	लाईफ इनश्युरन्स कार्पोरेशन ऑफ इंडिया विरूध्द प्रो. मनुभाई डी. शाह	१९९२ (००३) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०६३७
१०.	सेक्रेटरी,मिनिस्ट्री ऑफ इन्फर्मेशन ॲन्ड ब्रॉडकास्टिंग, गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया व इतर विरुध्द क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगाल व इतर	१९९५ (००२) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०१६१
११.	टाटा प्रेस लिमिटेड विरुध्द महानगर टेलिफोन निगम लिमिटेड व इ तर	१९९५ (००५) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०१३९
१२.	दिनेश त्रिवेदी, एम.पी. व इतर विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर	१९९७ (००४) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०३०६
१३.	युनियन ऑफ इंडिया व इतर विरूध्द मोशन पिक्चर असोसिएशन व इतर	१९९९ (००६) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०१५०
१४.	पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टी विरूध्द युनियन ऑफ इंडिया (२००४[२] सर्वोच्च न्यायालय प्रकरण ४७६)	२३-१२-२००४ (ए.आय.आर., १९७३, सर्वोच्च न्यायालय ६०

१. १९७३ बेनेट कोलमन वि. युनियन ऑफ इंडिया

या न्यूज प्रिंट व जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ खालील आदेशाच्या संदर्भातल्या निवाड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले होते की, "वृत्तपत्राचे संपादक, कंपनीचे संचालक अथवा भागधारक, नागरिक म्हणून राज्य घटनेच्या कलम १९ (१) प्रमाणे भाषण आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार, त्यांच्या वृत्तपत्रातील मतप्रदर्शनाने बजावत असतात असे ठरवून राज्य घटनेच्या कलम १९ (१) मध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे"

२. १९७५ साली उत्तर प्रदेश शासन विरुध्द राजनारायण व इतर (००४) SCC ०४२८ SC)

या माहितीच्या अधिकाराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या ठरलेल्या निवाड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मॅथ्यू यांनी खालीलप्रमाणे मत नोंदविले आहे.

"आपल्यासारख्या जबाबदारीच्या शासनामध्ये कमीत कमी गुपिते असावीत. या देशातील नागरिकांना सार्वजनिक निधीतून होणाऱ्या सर्व व्यवहारांचे सर्व तपशील जाणून घेण्याचा अधिकार आहे. सर्व शासकीय यंत्रणा या नागरिकांना उत्तरदायी असल्या पाहिजेत हाच खुल्या आणि पारदर्शी शासनाचा पाठ आहे."

३. मनेका गांधी विरुध्द युनियन ऑफ इंडिया (१९७८ AIR ५९७, १९७८ SCR(२) ६२१)

या निवाड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्य घटनेतील कलम १९ (१) बाबत असे म्हटले आहे की उच्चार आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याला भौगोलिक सीमा नसतात. नागरिक माहिती मिळविण्यासाठी आणि स्वतःचे मत व्यक्त करण्यासाठी असा अधिकार कोठेही व केव्हाही वापरू शकतात. या प्रकरणामधे सर्वोच्च न्यायालयाचे न्या. कृष्णा अय्यर यांनी असे नमूद केले की, जे सरकार गोपनीयतेच्या वलयातच कामकाज करते, ते केवळ लोकशाही मूल्याच्या विरोधात काम करते असे नव्हे, तर असे शासन स्वतःच्या कृतीनेच लोकशाही शासनाचे मूल्य संपवत असते.

४. १९८२ मधील एस. पी. गुप्ता विरुध्द युनियन ऑफ इंडिया (AIR) १९८२ SC (१४९)

या निवाड्याला माहिती अधिकाराच्या इतिहासात 'जजेस केस ' असे म्हणतात. या निवाड्यात प्रथमच राज्यघटनेच्या कलम १९ (१) मधील नागरिकांचा उच्चार व अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क व लोकशाहीतील खुल्या शासनाची संकल्पना विस्तारित करण्यात आली. माहिती राखून ठेवण्याच्या शासनाच्या हक्काचा व नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराचा अर्थ लावताना कलम १९ (१) मधील उच्चार व अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क हीच माहिती अधिकाराची घटनात्मक हमीसुध्दा आहे. म्हणजे यामध्येच माहिती अधिकार अंतर्भूत आहे असे स्पष्ट करण्यात आले.

५. इंडियन एक्स्प्रेस न्यूजपेपर्स प्रा. लि. व इतर विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर, १९८५ (००१) SCC ०६४१ SC

या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने माध्यमांच्या म्हणजे वृत्तपत्रस्वातंत्र्याच्या उच्चार व अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ लावताना असे म्हटले आहे की, माध्यमांचे उच्चार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य लोकशाही प्रणालीतील पायाभूत घटक आहेत आणि ज्यामुळे अशा स्वातंत्र्यावर निर्बंध आणले जातील अशा प्रत्येक बाबतीत न्यायालय या हक्काच्या संरक्षणाची भूमिका घेईल. माध्यमांच्या उच्चार व अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे तीन महत्त्वाचे घटक सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले आहेत ते म्हणजे १) सर्व मार्गाने माहिती मिळविण्याचा हक्क, २) माहिती प्रसिध्द करण्याचा हक्क ३) प्रसिध्द केलेली माहिती वितरित अथवा प्रसारित करण्याचा हक्क.

६. रिलायन्स पेट्रोकेमिकल्स लिमिटेड विरुध्द प्रोप्रायटर्स ऑफ इंडियन एक्स्प्रेस न्यूजपेपर्स प्रा. लि. व इतर (१९८८ (००४) SCC ०५९२ SC)

या निवाड्यात रिलायन्स पेट्रोकेमिकल्स लिमिटेड या कंपनीने काही परिवर्तनीय कर्जरोखे बाजारात आणण्याचे ठरविले होते. या संदर्भात काही खटले निरनिराळया न्यायालयात दाखल झाले. हे खटले चालू असताना इंडियन एक्सप्रेस या वृत्तसमूहाने

याबाबत आपले मतप्रदर्शन केले. त्याबाबत या वृत्तपत्राने आपले मतप्रदर्शन करणारे लेख प्रसिध्द करू नयेत असा मनाई हुकूम मागणारे एक प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे मत नोंदविले आहे.

आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की यंत्रयुगातील जीवन आणि लोकशाही यांच्या नागरिकांच्या सहभागाने होणाऱ्या विकासात लोकांना भाग घेण्यासाठी माहितीचा अधिकार महत्त्वाचा आहे. कलम २१ मध्ये नमूद केलेल्या जीवन जगण्याच्या आणि स्वातंत्र्य उपभोगण्याच्या अधिकाराचा विस्तार करण्यासाठीच माहितीचा अधिकार हा नागरिकांना मूलभूत अधिकार म्हणून महत्त्वाचा आहे.

७. पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टी विरूध्द युनियन ऑफ इंडिया (२००४[२] SCC ४७६)

या प्रकरणाच्या निवाडयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने महितीच्या अधिकाराला मानवी हक्काचा दर्जा दिला आणि शासन आणि प्रशासन पारदर्शी आणि उत्तरदायी करण्यासाठी शासनामध्ये नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे आणि त्यासाठी राज्यघटनेच्या कलम १९ (१)(क) मधील उच्चार आणि अभिव्यक्तिच्या हक्कामध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे यावर भर देण्यात आला.

वरील सर्व न्यायनिवाड्यांमधे कल्याणकारी राज्य व शासनाच्या अधिकाराच्या वापरावरील नागरिकांच्या आवश्यक अंकुशाबाबत भाष्य करण्यात आले आहे. तात्पर्य काय तर नागरिकांचे उच्चार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य हे माहितीचा अधिकार ध्वनित करतात व प्रगल्भ लोकशाहीसाठी ते आवश्यक असतात. म्हणूनच सर्वसामान्य स्वरूपाची माहिती सर्वांनाच सहजपणे उपलब्ध झाली पाहिजे, असे माहितीच्या अधिकार कायद्यात अपेक्षित आहे.

माहितीचा अधिकार कायदा भारतात संमत होण्यापूर्वी सततपणे माहितगार नागरिकांचे गट अशी तक्रार करीत असत की शासनाच्या धोरण निश्चितीच्या प्रक्रियेत, निर्णयप्रक्रियेत आणि अंमलबजावणी प्रक्रियेत नागरिकांना सहभागी होता येत नाही आणि वरील बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याची संधी फक्त मूठभर लोकांपुरतीच मर्यादित राहते. यामुळे नागरिकांमध्ये लोकशाहीविषयी 'तुटलेपण' निर्माण झाल्याबद्दल सतत चर्चा होत असते. वरील सर्व परिस्थितीला छेद देण्याची शक्यता माहितीच्या अधिकारामुळे निर्माण झाली आहे. पारदर्शकता, उत्तरदायित्व व लोकसहभाग या शब्दांना माहितीच्या अधिकारामुळे नव्याने अर्थ प्राप्त झाला.

या पारदर्शकतेच्या आग्रहाला जनसुनावण्यांचे खास भारतीय रूप देऊन राजस्थानातील मजदूर किसान शक्ती संघटनेने सामाजिक लेखापरीक्षण प्रक्रियेला विधायक वळण दिले. यापासून प्रेरणा घेऊन अनेक संघटनांनी या कायद्याच्या निर्मितीमध्ये दबावगट म्हणून काम केले. माहितीचा अधिकार कायद्याच्या निर्मितीला उपरोक्त अनेक आंतरराष्ट्रीय संदर्भ होते, तसेच भारतीय सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांचे व विविध चळवळींच्या कार्यकर्तृत्वाचे पाठबळही होते.

सन १९२३ चा कार्यालयीन गोपनीयतेचा कायदा (ऑफिशियल सिक्रेटस ॲक्ट), रद्द करण्यात यावा असा आग्रह धरणारा एक प्रवाह स्वातंत्र्योत्तर काळात भारतात अस्तित्वात होता. यातूनच कार्यालयीन गोपनीयतेच्या कायद्याचा पुनर्विचार करण्यासंबंधीची शिफारस काही समित्यांनी वेळोवेळी केली. वृत्तपत्रांबाबतच्या कायद्यासंदर्भात चौकशी करणा-या प्रेस लॉ इनक्वायरी कमिटीने १९४८ मध्येच सुचविले होते की, राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी आवश्यक तेवढ्याच गोष्टी गुप्त ठेवण्याच्या दृष्टीने १९२३ च्या गुप्ततेच्या कायद्यात सुधारणा करावी, कारण ते या संदर्भातील जीनिव्हा बैठकीतील शिफारशींशी सुसंगत असेल. याशिवाय १९५४ चे प्रेस कमिशन, १९७१ चा विधी आयोग यांनीही या कायद्याची छाननी केली होती. सन १९६७ मध्ये

या कायद्यात काही दुरुस्त्या करण्यात आल्या. १९७७ मध्ये या संदर्भात नेमलेल्या आणखी एका अभ्यास गटाने, हा कायदा दुरुस्त करण्याची मागणी केली होती. त्यानंतर १९८२ ते १९८३, १९९० या काळातही गोपनीयतेच्या कायद्याचा पुनर्विचार व्हावा अशी मागणी काही समित्या, कार्यगट यांनी केली. परंतु राष्ट्रीय सुरक्षिततेच्या कारणामुळे गोपनीयतेच्या कायद्यात दुरुस्त्या करण्यात आल्या नाहीत.

राज्यकर्ते व नोकरशाही यांच्या विरोधाला न जुमानता, नागरिकांच्या उच्चार व विचार स्वातंत्र्यातच हा माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे, अशी विविध न्यायालयांनी वेळोवेळी भूमिका घेतली. भारतीय राज्यघटनेच्या तत्त्वज्ञानातच माहितीच्या अधिकाराचे मूळ आहे, असे न्याय पालिकेने मानले. तसेच राज्यघटनेच्या कलम १४ मधील समतेचा अधिकार व कलम २१ मधील व्यक्तिगत स्वातंत्र्य किंवा जगण्याचा अधिकार यांच्यामध्ये माहितीच्या अधिकाराचे गर्भित अस्तित्व मान्य करण्यात आले आहे. हमदर्द दवाखाना विरुध्द भारत सरकार या प्रकरणात भाषण व अभिव्यक्तिस्वातंत्र्यात सार्वजनिक हिताचा विचार व माहितीचा अधिकार समाविष्ट आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. १९७५ मध्ये राजनारायण विरुध्द उत्तर प्रदेश सरकार, या खटल्याच्या निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मॅथ्यू यांनी स्पष्ट केले की, आपल्यासारख्या जबाबदार शासन असलेल्या देशात फार थोड्या गोष्टी गुप्त असू शकतात. एस. पी. गुप्ता विरुध्द भारत सरकार या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले की, लोकशाही व्यवस्था स्वीकारलेल्या देशात, उत्तरदायित्वाविना शासन सत्तेवर राहू शकत नाही. शासनाच्या पारदर्शक कारभाराचा थेट संबंध, माहितीच्या अधिकाराशी आहे. हा अधिकार राज्यघटनेच्या कलम १९(१) (क) मध्ये अंतर्भूत आहे. शासकीय आदेश, शासननिर्णय जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या प्रक्रियेला कायदेशीर रूप देण्याची आवश्यकता न्यायालयाने प्रतिपादन केली, त्यामुळे माहिती अधिकाराच्या संकल्पनेला बळ मिळाले. ओरिसा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व पर्यावरणवादी विचारवंत पूर्णचंद्र मिश्रांच्या मते,

''स्वातंत्र्याच्या अधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नागरिकांना ज्या संदर्भात, त्या अधिकारांचा वापर करायचा आहे, त्याची माहिती असणे नितांत आवश्यक आहे. अन्यथा कलम १९ (१) (क) मधील स्वातंत्र्य निरर्थक ठरेल किंवा तो अधिकार नाकारल्यासारखे होईल.'' थोडक्यात, सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकाराला राज्यघटनेतील मूलभूत अधिकारांचा दर्जा असल्याचे स्पष्ट केले आहे.

१९९० नंतर सामाजिक क्षेत्रात काम करणा-या स्वयंसेवी संस्थांनी या कायद्याची निर्मिती होण्याच्या दृष्टीने पोषक अशी पार्श्वभूमी तयार केली. या प्रयत्नामध्ये राजस्थानच्या मजदूर किसान शक्ती संघटनेचा प्रयत्न अत्यंत महत्त्वाचा आहे. श्रीमती अरुणा रॉय, निखिल डे यांनी सामाजिक लेखाजोखा म्हणजे सामाजिक लेखापरीक्षणाच्या (सोशल ऑडिट) माध्यमातून शासकीय कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी जनसुनावणी (पब्लिक हिअरिंग) व माहितीचा अधिकार यांचा सुरेख वापर केला. त्यांनी सामाजिक लेखापरीक्षणांतर्गत रोजगार योजनेच्या नोंदवहीचे (रजिस्टर) जाहीर वाचन केले. प्रत्यक्ष जनता व शासनकर्ते यांना व्यासपीठावर आणून जनतेला त्यांना जाब विचारण्याची संधी देण्यात आली. यामुळे नोंदवहीमध्ये बनावट नावाची नोंद करून, बनावट सह्या व अंगठ्याचे छाप घेऊन ख-या मजुरांना कामापासून वंचित ठेवण्याचे प्रकार बंद झाले. मजुरांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्या श्रमाच्या तुलनेत कमी रक्कम देण्याच्या प्रथेला आळा बसला. रोजगार पुरविण्याच्या योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या साधनसामग्रीची किंमत वाढवून दाखवण्याचे प्रकार बंद झाले. सामाजिक लेखापरीक्षणाच्या परिणामांची दखल शासनानेही घेतली. अलिकडे तर राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सामाजिक लेखापरीक्षणाची तरतूद कायद्यातच करण्यात आली आहे, राजस्थान सरकारने पंचायतराज अधिनियमांमध्ये सुधारणा करून वॉर्डसभेच्या विकासकामांचे सामाजिक लेखापरिक्षण करण्याची मूलभूत तरतूद कायद्यामध्ये केली आहे. जनसुनावणीच्या प्रक्रियेमध्ये तेथील जनमानस, गावांमधील सर्वसामान्यांची स्थिती, त्यांचे खरे प्रश्न व गावातील पारंपारिक

समाजरचना व उतरंड यांचा विचार करण्यात आला. राजस्थानातील डुंगरपूर जिल्ह्याबरोबरच देशभरात अनेक ठिकाणी माहिती अधिकाराचा व त्या जोडीला जनसुनावणीचा वापर करून विविध क्षेत्रातील गैरप्रकार व शासनामधील अकार्यक्षमता कमी करण्याचे प्रयत्न होत आहेत. आंध्रप्रदेशाचा अनंतपूर जिल्हा व उत्तरप्रदेशातील हरदोई जिल्हा या सारखे जिल्हे या कामी अग्रभागी आहेत. या आंदोलनांनी 'जनसुनावणी', 'सामाजिक लेखापरीक्षण' यासारख्या अर्थपूर्ण शब्दांची भर सामाजिक इतिहासात घातली.

राजस्थानातील सामाजिक लेखापरीक्षणाच्या यशस्वी चळवळीपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रामध्ये माहिती अधिकाराचा महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा, २००२ करण्यात आला. या कायद्यात आवश्यक त्या लोकोपयोगी दुरुस्त्या व्हाव्यात यासाठी अण्णा हजारे यांनी आंदोलनाच्या माध्यमातून आग्रह धरला. त्यांचे आंदोलन व त्या कायद्याबाबत देशपातळीवर व आंतरराष्ट्रीय पातळीवर बदलत चाललेले वातावरण यांच्यामुळे परिणामी, महाराष्ट्र शासनाने या कायद्यात दुरुस्त्या सुचविण्यासाठी सर्वश्री माधव गोडबोले, सत्यरंजन साठे, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी आणि न्या. नरेंद्र चपळगावकर या तज्ज्ञांची समिती स्थापन करून त्यांनी केलेल्या शिफारशींचा विचार करून २००२ मध्ये कायद्यात सुधारणा केली व त्यानुसार सुधारित कायद्याची अंमलबजावणी २००३ पासून सुरू केली. अन्य राज्यांमध्ये देखील माहितीच्या अधिकाराचे लोण पसरले होते.

शासन कारभारात पारदर्शकता असावी, अशी मागणी मुख्यत: करण्यात आली. बेरोजगारी, कल्याणकारी योजनांची ढिसाळ अंमलबजावणी, अभिव्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी, नोकरशाहीचा पगडा यांना विरोध करताना विविध राज्यांमधील चळवळी तसेच स्वयंसेवी संस्थांनी माहितीच्या अधिकाराचा प्रश्न उचलून धरला. परिणामी, केंद्रीय कायदा येण्यापूर्वीच एकूण ११ राज्यांनी, माहितीचा अधिकार कायदा किंवा त्यासंबंधीचे नियम बनवण्यास सुरुवात केली. राज्यस्तरावरील या कायद्यांमध्ये समानतेचा अभाव होता. दिल्ली व महाराष्ट्रातील कायदे अधिक सक्षम होते. या कायद्यातून जनतेमध्ये निर्माण झालेली चेतना व लोकसहभागाची शक्यता यांच्यामुळे व्यावहारिक, सैद्धान्तिक व नैतिकदृष्ट्या सक्षम अशा माहिती अधिकाराची पायाभरणी झाली. पूर्ण देशभर सर्वत्र समान तरतुदी असणारा केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा असावा अशी लोकप्रिय मागणी पुढे आली आणि त्या दिशेने केंद्र शासनाकडे सर्व स्तरावरून पाठपुरावा सुरू झाला.

केंद्रीय कायद्यापूर्वीचे राज्यांचे माहिती अधिकार कायदे	
१. तमीळनाडू	१९९७
२. गोवा	१९९७
३. कर्नाटक	२०००
४. राजस्थान	२०००
५. उत्तर प्रदेश	२०००
६. दिल्ली	२००१
७. महाराष्ट्र	२००२
८. आसाम	२००२
९. मध्य प्रदेश	२००३
१०.जम्मू काश्मीर	२००३
११.केरळ	विधेयक
१२. ओरिसा	विधेयक

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३

१. भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या कलमांमध्ये माहितीच्या अधिकाराचे गर्भित अस्तित्व मान्य करण्यात आला आहे?

२. जनसुनावणीच्या माध्यमातून सामाजिक लेखापरीक्षणाला सुरुवात करणाऱ्या जन संघटनेचे नाव सांगा.

३. महाराष्ट्रात माहिती अधिकाराची चळवळ कोणी उभारली?

४. देशात सर्वप्रथम माहितीच्या अधिकाराचा स्वीकार कोणत्या राज्याने केला?

१.५ कायदा निर्मितीसाठी अन्य काही प्रयत्न :

माहितीच्या विधेयकाचे प्रारूप बनवण्याचे श्रेय हे प्रेस कौन्सिलकडे जाते.

- ऑक्टोबर १९९७ मध्ये मसूरी येथील लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन प्रबोधिनीमध्ये, सामाजिक कार्यकर्ते, कायदेतज्ज्ञ आणि शासकीय अधिकारी यांच्या बैठकीत प्रेस कौन्सिलने कायद्याबाबतचे विचार चर्चेसाठी ठेवले. या चर्चेच्या आधारे विधेयकाचे प्रारूप तयार करण्यात आले. या प्रारूपातील चौकटीतच आजचा माहिती अधिकार कायदा कार्यरत आहे. प्रेस कौन्सिलच्या विधेयकामुळे या विषयावर व्यापक चर्चा सुरू झाली
- १९९७ मध्ये मुख्यमंत्र्यांच्या परिषदेमध्ये प्रशासन अधिक प्रतिसादात्मक होण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी आपापल्या कार्यक्षेत्रात माहितीच्या अधिकाराबाबत कायदे करण्याचे आवाहन करणारा ठराव संमत केला. परिणामी लवकरच ११ राज्यांमध्ये असे कायदे अस्तित्वात आले.
- केंद्र सरकारने माहिती अधिकाराबाबत जनतेचा वाढता आग्रह पाहून 'कॉमन कॉज' या स्वयंसेवी संस्थेचे प्रमुख एच. डी. शौरी यांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यासगटाची स्थापना केली. या अभ्यासगटाने आपला अहवाल आणि त्यासोबतचा मसुदा २४ मे १९९७ ला केंद्राला सादर केला.
- केंद्र सरकारने त्यानंतर २५ जुलै १९९७ रोजी माहितीच्या स्वातंत्र्याचे विधेयक (फ्रिडम ऑफ इन्फर्मेशन बील) संसदेत मांडले.
- संसदेने २६ डिसेंबर २००२ ला हे विधेयक समंत केले. या विधेयकाला १० जानेवारी २००३ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाली व माहितीच्या स्वातंत्र्याचा कायदा (फ्रिडम ऑफ इन्फर्मेशन ॲक्ट, २०००) अस्तित्वात आला. परंतु हा कायदा अस्तित्वात

येण्यासाठी आवश्यक अधिसूचना काढण्यात आली नाही, तसेच नियमावली तयार करण्यात आली नाही.

- तोपर्यंत देशाच्या विविध राज्यांमध्ये कायदे अस्तित्वात आलेले असल्यामुळे, देशभर या कायद्याबाबत सुसूत्रता असावी अशी मागणी अनेक व्यक्तींनी व संस्थांनी केली.

- सन २००४ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत संयुक्त पुरोगामी आघाडीने (यूपीए) आपल्या किमान समान कार्यक्रमात माहितीच्या अधिकाराचा कायदा समाविष्ट करून या कायद्याच्या विचारविनिमयाची प्रक्रिया सुरू केली. परिणामी यूपीए सत्तेवर आल्यानंतर, केंद्रसरकारने **माहितीच्या स्वातंत्र्याच्या कायदा, २०००** च्या जागी माहितीच्या अधिकाराबाबतचे विधेयक मांडले आणि सविस्तर चर्चा करून संमत करून घेतले.

माहितीचा अधिकार कायदा, २००५ संसदीय प्रवास

अ.क्र	तपशील	दिनांक
१	माहिती अधिकार विधेयक लोकसभेत सादर	२३-१२-२००४
२	माहिती अधिकार कायदा २००५ लोकसभेत संमत	११-०५-२००५
३	कायद्याला राष्ट्रपतींची संमती व अंशत: कायद्यातील काही तरदी लागू	१५-०६-२००५
४	माहितीचा अधिकार कायदा, २००५ केंद्रशासनाच्या राजपत्रात प्रसिध्द	२१-०६-२००५
५	जम्मू काश्मीर वगळता देशभर संपूर्ण कायदा लागू	१२-१०-२००५

- केंद्रीय कायदा सन २००५ पासून लागू झाल्यानंतर राज्यांतील कायदे संपुष्टात आले.

- १५ जून २००५ ला राष्ट्रपतींची मान्यता मिळाल्यानंतर, त्यातील काही तरतुदी लगेच तर काही तरतुदी १२० दिवसानंतर म्हणजे १२ ऑक्टोबर २००५ पासून लागू झाल्या. अशी या कायद्याची अंमलबजावणी (जम्मू आणि काश्मीर राज्याचा अपवाद वगळता) पूर्ण देशभर सुरू झाली.

एकूणच, १९९० च्या दशकात माहितीच्या अधिकाराची चळवळ गतिमान झाली असली तरी, ही गतिमानता अचानक आलेली नाही. या गतिमानतेच्या पाठीमागे प्रभावशाली

वित्तीय संस्थांची आंतरराष्ट्रीय धोरणे, राष्ट्रीय स्तरावर विविध न्यायालयीन निर्णय, सक्रिय अभ्यासगट व चळवळी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. नागरिकांना त्यांचा घटनात्मक माहितीचा अधिकार बजावण्यासाठी व्यवहार्य अशी चौकट या कायद्याने सुचविली आहे. आता या कायद्याच्या अंमलबजावणीत येणाऱ्या व्यावहारिक अडचणीपासून व आंतरराष्ट्रीय अनुभवांपासून धडा घेऊन त्यावर मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. माहितीचा कायदा तपशीलात समजून घेण्यासाठी या कायद्याची ही ऐतिहासिक पार्श्वभूमी दिशादर्शक ठरू शकेल.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-४

१. माहितीचा अधिकार आणि विकासाचा असणारा असणारा संबंध स्पष्ट करा.

२. माहितीचा अधिकार आणण्यामध्ये न्यायालयांनी बजावलेली भूमिका स्पष्टकरा.

३. जनसुनावणी म्हणजे काय? उदाहरण देऊन स्पष्ट करा.

१.६ माहिती अधिकाराची मूलतत्त्वे

माहिती अधिकाराची मूलतत्त्वे

१. जास्तीत जास्त माहिती खुली करणे व व अद्ययावत करून सतत प्रसारित करणे ...
२. सार्वजनिक प्राधिकरणावर स्वयंप्रेरणेने माहिती प्रसिध्द करण्याचे कायदेशीर बंधन.
३. शासन व्यवहारात पारदर्शकता व खुलेपणा.
४. विहित कालावधित अर्ज व अपिलावर निर्णय घेण्याचे बंधन
५. माहिती देणे हा नियम, माहिती नाकारणे हा अपवाद (कमीत कमी माहिती नाकारणे)
६. नागरिकांना माहिती पुरविण्यासाठी व्यवहार्य यंत्रणा.
७. माहितीसाठी वाजवी शुल्क आकारणी.
८. माहिती पाहाण्याचा आणि नमुने घेण्याचा अधिकार.
९. सार्वजनिक हिताला सर्वोच्च प्राधान्य.
१०. सद्‌भावनेने केलेल्या कामाला संरक्षण.
११. माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे हे उघड करणे अर्जदारांवर बंधनकारक नाही.
१२. एखाद्या व्यक्तीचे जीवित व स्वातंत्र्य या संबंधातील माहिती, तिची मागणी केल्यापासून ४८ तासात पुरविण्याची तरतूद.
१३. माहिती आयोगाचा निर्णय अंतिम व बंधनकारक
१४. अर्जदारास देय असलेली माहिती विहित मुदतीत न दिल्यास, अथवा मुदतीत का देता येत नाही ते सकारण अर्जदारास न कळविल्याच्या प्रकरणात जबाबदार असणा-या माहिती अधिका-याला शास्तीची तरतूद.

१.७ महिती अधिकार कायद्याचे ठळक वैशिष्टये

महिती अधिकार कायद्याचे ठळक वैशिष्टये खालिल्प्रमाणे आहेत :

- माहिती जाणुन घेणेची इच्छा असणा-या कोणत्याही नागरिकाला माहिती मागण्याचा अधिकार आहे.
- अर्जाचा नमुना विहित केला असल्यास अशा नमुन्यात अगर साध्या कागदावर आवश्यक माहितीचा तपशील, संपर्काचा पत्ता व रू.१०/- शुल्क असा अर्ज पुरेसा ठरेल.
- माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे हे उघड करणे अर्जदारांवर बंधनकारक नाही.
- माहितीच्या अधिकारामध्ये कामाचे निरिक्षण अथवा तपासणी (Inspection) सुध्दा अंतर्भूत आहे.
- माहितीच्या अधिकारामध्ये शासकीय कामाचे साहित्य अथवा सामूग्रीचे नमुने (Samples) घेणे सुध्दा अंतर्भुत आहे.
- सर्वसाधारणपणे माहिती मागणी केल्यापासून ३० दिवसाचे आत द्यावी अशी तरतूद आहे.
- जर माहिती मागण्याचा अर्ज सहायक माहिती अधिकारी यांच्याकडे दिला असेल तर आणखी ५ दिवस जास्त मुदत दिली जाऊ शकते.
- जर मागणी केलेली माहिती त्रयस्थ व्यक्ती अगर संस्थेची असेल तर त्यांना नोटीस देऊन म्हणणे एकणे इत्यादी साठीचा कालावधी विचारात घेऊन माहिती देणेसाठी ४० दिवस अशी मुदत विहित केलेली आहे.
- एखाद्या व्यक्तीचे जीवित व स्वातंत्र्य या संबंधातील माहिती, तिची मागणी केलेपासुन ४८ तासात पुरविण्याची तरतुद आहे.

- केंद्रीय/राज्य शासकीय जन माहिती अधिका-याच्या आदेशाविरुध्द त्यांचे वरिष्ठ असणाऱ्या अपिलीय अधिका-याकडे ३० दिवसात अपील करता येईल. (वाजवी कारणामुळे विलंब झाल्यास खातरजमा केल्यानंतर अपील दाखल करून घेता येईल.)
- केंद्रीय/राज्य प्रथम अपिलीय प्राधिका-याचे आदेशाविरुध्द त्यांचे केंद्रीय/राज्य माहिती आयुक्त यांचेकडे ९० दिवसात अपिल करता येईल. (वाजवी कारणामुळे विलंब झाल्यास खातरजमा केल्यानंतर अपील दाखल करून घेता येईल.)
- जाणीवपूर्वक माहिती नाकारली अगर चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असे आढळून आल्यास संबधित जन माहिती अधिका-याविरुध्द सेवा नियमातील तरतुदीनुसार कारवाई प्रस्तावित केली जाऊ शकते.
- अर्जदारास देय असलेली माहिती विहित मुदतीत न दिल्यास, अथवा मुदतीत का देता येत नाही, ते सकारण अर्जदारास न कळविल्याच्या प्रकरणात अशा जन माहिती अधिका-यास माहिती आयुक्त अर्जाचे तारखेपासून माहिती पुरविली जाईपर्यंत प्रत्येक दिवसासाठी रु. २५०/- असा दंड केला जाऊ शकतो. असा जास्तीत जास्त दंड रू. २५०००/- पर्यंत केला जाऊ शकतो.

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–५

१. माहिती अधिकार कायद्याचे मुलतत्वे स्पष्ट करा

२. माहिती अधिकार कायद्याचे पाच ठळक वैशिष्टये लिहा.

३. प्रथम अपिल व दुसरे अपिल करण्यासाठी विहित केलेला कालावधी नमुद करा.

१.७ माहितीचा अधिकार - महत्त्वाच्या संकल्पना

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपण खालील गोष्टी करू शकाल :

१. माहिती या व्याख्येचे वर्णन करू शकाल.

२. सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येचे वर्णन करू शकाल.

३. माहितीचा अधिकार ही संकल्पना स्पष्ट करू शकाल.

४. जन माहिती अधिकारी व साहाय्यक जन माहिती अधिकारी यांच्या कायद्यातील भूमिकांचे वर्णन करू शकाल.

५. इतर कायद्यांच्या तुलनेत माहितीच्या अधिकाराला प्राप्त झालेला अधिभावी परिणामाचे आपण वर्णन करू शकाल.

६. माहिती मिळविण्याकरिता भरावयाचे शुल्क व आकारणी संबंधी नियमांचे वर्णन करू शकाल.

७. प्रकटीकरणास अपवाद असलेल्या माहितीचे वर्णन करू शकाल.

८. माहिती आयोगामार्फत अपील व तक्रारींचे निवारण करण्याच्या कार्यपद्धतीचे वर्णन करू शकाल.

९. या कायद्यामुळे कार्यालयीन अभिलेख जतन करण्याचे महत्त्व आपण स्पष्ट करू शकाल.

१०. त्रयस्थ पक्षाची माहिती व त्रयस्थ पक्षाची माहिती देण्याविषयीच्या कार्यपद्धतीचे वर्णन करू शकाल.

प्रास्ताविक :

सर्वोच्च असणाऱ्या लोकशाही आदर्शांचा आदर करीत ज्या नागरिकांना हा हक्क बजावण्याची इच्छा आहे अशा सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार देण्याच्या हेतूने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा कायदा करण्यात आला आहे. माहितीचा अधिकार हा लोकशाहीचा पाया असून त्यामुळे एकुणच राज्यकारभारात पारदर्शकता, खुलेपणा व जे नागरिक लोकशाही शासन निवडतात त्यांच्या प्रती जबाबदारीची (उत्तरदायित्वाची) जाणीव आणणे या प्रमुख उद्देशाने हा कायदा करण्यात आला आहे. माहिती अधिकार कायद्याने आता खुलेपणाचे पर्व सुरू केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमाचे मुख्य उद्दिष्ट नागरिकांना सक्षम करणे, शासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व यांना प्रोत्साहन देणे, भ्रष्टाचार नियंत्रित करणे आणि खऱ्या अर्थाने लोकांसाठी काम करणारी लोकशाही निर्माण करणे, हे आहे. शासनाला त्याच्या कारभारात अधिक उत्तरदायी बनवण्यासाठी आणि शासकीय यंत्रणांवर आवश्यक संनियंत्रण/लक्ष ठेवण्यासाठी, हा कायदा सजग/माहितीगार नागरिकाला अधिक सुसज्ज बनवतो. शासकीय कार्यक्रम नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी, हा अधिनियम म्हणजे एक मोठे पाऊल आहे.

हा कायदा करताना संवेदनशील माहितीची गोपनियता राखणे आणि तरीही खुलेपणाचे मूल्य जपणे, जास्तीत जास्त माहितीचे खुले प्रकटण करणे व इतर सार्वजनिक हितसंबंधांचे संरक्षण करणे तसेच माहितीच्या अर्जानुसार माहिती खुली करीत असताना मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर करणे असे पेच विचारात घेऊन अशा सर्व अंतर्विरोधी बाबींचा सुसंवाद साधण्याच्या तरतुदी करून हा कायदा करण्यात आला आहे. या कायद्यातल्या कोणत्याही कलमातील तरतुदीचा अर्थ लावताना अडचण वाटल्यास कायद्याच्या उद्देशाकडे डोकावून पाहावे .

राज्यघटनेने नागरिकांना पूर्णतया हमी दिलेला अधिकार म्हणजेच 'माहितीचा अधिकार'. भारतीय संसदेने माहिती मिळवण्याचा व्यवहार्य मार्ग म्हणून, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंमलात आणला. या कायद्याच्या रूपाने, शासनाने नागरिकांना त्यांचा हक्क म्हणून, एक प्रभावी साधन दिले. नव्याने अस्तित्वात आलेला हा कायदा, अतिशय व्यापक आहे; तो खऱ्या अर्थाने राज्यकारभाराच्या सर्व बाबींना व्यापतो. हा कायदा शासनाच्या सर्व स्तरांना म्हणजे केंद्र, राज्य व स्थानिक स्तरांना लागू होतो आणि त्याच बरोबर शासकीय अनुदानांचा लाभ घेणाऱ्या सर्व संस्थांनाही बंधनकारक आहे.

महत्त्वाच्या संकल्पना

माहिती म्हणजे काय ?

माहिती याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (मेमोज्),ई–मेल, अभिप्राय (ओपिनियन), सूचना (ॲडव्हाईसेस), प्रसिद्धिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या (लॉगबुक्स), संविदा (कॉन्ट्रॅक्ट), अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी, कोणत्याही **खाजगी निकायाशी** (प्राईव्हेट बॉडी) संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

सार्वजनिक स्वरूपाची माहिती

जनसामान्यांचा शासनाशी तसेच शासकीय, निमशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था व सर्व स्तरावरील प्रशासकीय यंत्रणाशी होणा-या सार्वजनिक स्वरूपाच्या कामकाजातून व परस्पर व्यवहारातून शासकीय माहिती जन्मते. ती माहिती औपचारीक अभिलेखाच्या स्वरूपात या शासकीय व निमशासकीय संस्था धारण करतात. अशा माहीतीचे नियमन करण्यासाठी कार्यपध्दती, नियम आणि व्यवस्था शासन ठरविते. मात्र

यापैकी कोणीही या माहीतीचे मालक असत नाही. लोकशाही शासनप्रणाली मध्ये जेथे शासनच लोकांचे असते तेथे सर्व प्रकारची शासकीय अभिलेखातील माहीती देखील लोकांचीच असते. मात्र ती विश्वस्तांच्या भूमिकेतून धारण करण्याचे काम विविध शासकीय, निमशासकीय कार्यालये व शासन अनुदानीत संस्था करीत असतात. अशी लोकोपयोगी माहिती खुली करण्यासाठी व्यवहार्य यंत्रणा व कार्यपध्दती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याने उपलब्ध करून दिली आहे.

शासनाने स्वयंस्फुर्तीने जनतेला पुरवावयाची माहिती

या माहितीसाठी कोणत्याही नागरिकाला शासनाकडे माहिती मागण्यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही. सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना व शासकीय कार्यालयांना या कायद्याच्या कलम ४(१) (ब) मधे नमुद केलेल्या १७ बाबींची माहिती न मागता जनतेसाठी खुली करणे व ती सतत अद्यावत ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. अशी माहिती हा कायदा लागू झाल्यापासून १२० दिवसात खुली करणे व ती सतत अद्ययावत करणे या कायद्याने बंधनकारक करण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन आदेश क्रमांक-केंमाअ-२००९/६३१/प्र.क्र.२६७/०९/सहा दिनांक - २४ जुलै, २००९ द्वारे पुन्हा शासनाने याबाबत आढावा घेऊन सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वयंस्फुर्तीने करावयाचे प्रकटन करावे व ते सतत अद्ययावत ठेवावे असे आदेशित केले आहे.

या माहितीमध्ये सर्वसाधारणपणे कार्यालयाची माहिती, संघटन तक्ता, केल्या जाणा-या कामाचा तपशील, अधिकारी व कर्मचा-यांची नावे, कार्यकक्षा, त्यांची कामे, त्यांचे अधिकार, निर्णय प्रक्रियेसाठी निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीचा तपशील, त्यांचे वेतन व भत्तेविषयक तपशील, त्यांना काम करण्यासाठी ठरवून देण्यात आलेले इष्टांक अगर लक्ष्य, पर्यवेक्षणाची यंत्रणा आणि उत्तरादायित्वाची परिमाणे, काम करण्यासाठी ठरवून दिलेली प्रमाणके, शासकीय काम पार पाडताना पाळावे लागणारे नियम, विनियम, सुचना, नियमपुस्तिका, शासन निर्णय, परिपत्रके, आदेश आणि कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाची यादी इत्यादी याशिवाय शासकीय समित्या, परिषदा, त्यांच्या

सभा, इतिवृत्ते, कार्यालयांना मिळणारे निधी, होणारे खर्च, अंदाजपत्रके, निविदा विषयक माहिती, राबविण्यात येणा-या योजना, लाभार्थी निवड्पध्दती, लाभार्थीची यादी, दिल्या जाणा-या कल्याणकारी सेवा, दिले जाणारे अर्थसहाय्य, सवलती, परवाने, परवानगी, ना-हरकत प्रमाणपत्रे, त्यासाठीची कार्यपध्दती, शासकिय माहिती अधिकारी, सहायक शासकीय माहिती अधिकारी, अपील प्राधिकारी यांची यादी, पत्ते व त्यांची कार्यकक्षा, अशी जी माहिती वैयक्तिक स्वरूपाची नाही अशी प्रत्येक कार्यालयाची नागरिकांना समजेल अशा स्थानिक भाषेत माहिती उपलब्ध करणे, ती सर्वांसाठी खुली ठेवणे, एवढेच नव्हे तर अशा माहितीला कार्यालयाचे सूचनाफलक, वृत्तपत्रे, इंटरनेट, स्थानिक वृत्त प्रसारणे, इलेक्ट्रॉनिक मिडिया इत्यादी मार्फ़त व्यापक प्रसिध्दी देणे, नागरिकांना अवलोकनासाठी अथवा तपासण्यासाठी अशी माहिती सतत अद्ययावत करून खुली ठेवणे हे प्रत्येक शासकीय प्राधिका-यास बंधनकारक आहे.

या कायद्यातील कलम ४ नुसार अशी माहिती सुलभपणे नागरिकांना उपलब्ध व्हावी, हवी तेथे ती पहाता यावी यासाठी अशा सर्व माहितीचे टप्प्याट्प्प्याने संगणकीकरण करावे, माहिती तत्रज्ञान, संदेश वहनाचे तंत्रज्ञान तसेच अभिलेख आणि माहितीचे व्यवस्थापन अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून जनतेला आवश्यक असणारी व या कायद्यानुसार देता येऊ शकेल अशी माहिती नागरिकांनी न मागता सर्वत्र उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी अशीही तरतूद या कायद्यात आहे. शासनव्यवस्थेतील सर्वांनाच त्यांच्या सकारात्मक जबाबदारीचे आणि नागरिकांच्या प्रती आवश्यक असणा-या उत्तरादायित्वाचे भान जागविणारी तसेच ई-शासनाची रूपरेषा ठरवुन देणारी ही तरतूद आहे. हा कायदा हीच सु-शासनाची पाऊलवाट आहे असे दिसून येते.

माहितीचे व्यवस्थापन

माहिती म्हणजे पुर्णांशाने ज्ञान नसले तरी ज्ञानाच्या दिशेने जाणारी पाऊलवाट नक्कीच असते. शासकीय कार्यालयांमध्ये जनजीवनाच्या नियमनाच्या शासन व्यवहारातून निर्माण होणारी प्रचंड माहिती साठलेली असते. अशा माहितीचे वर्गीकरण, संस्करण

आणि विश्लेषण करणे आवश्यक असते. अशी माहिती पदोपदी नागरिकांना हवी असते. त्याशिवाय जे शासन निवडून दिले, त्या शासनाकडून केल्या जाणा-या प्रत्येक कृतीची माहिती जाणून घेण्याचा, नागरिकांना हक्क असतो. माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ४ याबाबत एक कायदेशीर चौकटच आखून देतो. ती सुशासनाची चौकट आहे.

पारदर्शकता

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या क्रांतीकारी कायद्यात पारदर्शकता व खुलेपणा हे महत्त्वाचे जीनवनमूल्य अंतर्भूत आहे. हा कायदा समजून घेण्यासाठी या कायद्याचे उद्देश पुन्हा पुन्हा वाचले पाहिजेत. शासन व प्रशासनाच्या सर्व स्तरावर आवश्यक असणारा खुलेपणा व पारदर्शकता ही अत्यंत महत्त्वाची दोन जीवनमूल्ये या कायद्यात नमूद केलेली आहेत. शासनव्यवस्थेत सर्वोच्च स्तरावरचा खुलेपणा व पारदर्शकता हे समृध्द लोकशाहीचे महत्त्वाचे लक्षण मानले जाते. खुलेपणाच्या मर्यादाही या कायद्यात स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. म्हणजेच खुलेपणा म्हणजे नग्नता नव्हे याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे. या कायद्याच्या उद्देशामध्येच अशा परस्पर विरोधी बाबींचा मेळ घालण्यासाठी, हा अधिनियम करण्यात आला आहे असे म्हटले आहे.

पारदर्शकता हे सर्वोच्च लोकशाही मुल्य

आपण किड लागलेले धान्य उन्हात का वाळवतो ? आपण अंधा-या खोलीचे दरवाजे खिडक्या उघडून खुली हवा व सुर्यप्रकाश का घेतो ? सूर्यप्रकाशाशिवाय जगणे अवघड का असते ? कारण सूर्यप्रकाश हा उर्जेचा स्त्रोत तर असतोच, तसेच अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश लुईस ब्रॅडीज यांनी म्हटल्याप्रमाणे *सूर्यप्रकाश हा सर्वात प्रभावी किटकनाशकही असतो* (Sunlight is the Best Disinfectant). खुलेपन व सर्व व्यवहारातील पारदर्शकता म्हणजे शासन प्रशासन व्यवस्थेतल्या अंधाराला आव्हान देणारा सूर्यप्रकाशच असतो. पारदर्शकतेच्या सूर्यप्रकाशात बिघडलेल्या व्यवस्थेचे निर्जंतुकीकरण व्हावे, असेच अलिकडे संमत करण्यात आलेल्या सुशासनाच्या सर्व कायद्यांना अपेक्षित आहे. पारदर्शकता ही सुर्यप्रकाशासारखी तीव्रही असते, तसेच ती

व्यवस्थेचे आरोग्य सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक असणारी जीवनदायी उर्जाही असते. पारदर्शकता हे सर्वोच्च लोकशाही मूल्य असून, सार्वजनिक व्यवहाराच्या बाबतीत खुलेपणा असावा व माहितीचे प्रवाह खुले असले पाहिजेत, हाच सुशासनाच्या सर्व कायद्यांचा सार आहे.

सार्वजनिक हित :

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये **सार्वजनिक हित** ही संकल्पना बरेच ठिकाणी आढळते. मात्र त्याची व्याख्या या कायद्यामध्ये दिलेली नाही. सर्वसाधारणपणे जे व्यापक जनहिताचे असते, त्यामध्ये सार्वजनिक हित दडलेले असते, असे समजण्यात येते. सार्वजनिक हित म्हणजे सर्वसाधारण जनतेचे कल्याण अथवा जनतेच्या हिताच्या बाबी. सर्वसाधारणपणे सार्वजनिक हित हे, कोणत्याही सार्वजनिक धोरणाच्या केंद्रस्थानी असते. नागरिकांना माहिती पुरविणे हे आपल्या देशाचे असणारे घटनात्मक सार्वजनिक धोरणच आहे. या धोरणाच्या केंद्रस्थानी देखील सार्वजनिक हित आहे.

कलम ८ मधील माहिती खुली करण्याबाबतचे अपवाद हे गुणात्मक स्वरूपाचे आहेत व ते तपासून घेऊन सार्वजनिक हिताची कसोटी लावून माहिती द्यावी किंवा न द्यावी याबाबतचे निर्णय घ्यावे लागतात.

सार्वजनिक प्राधिकरण म्हणजे काय ?

संविधानाद्वारे किंवा तद्न्वये, संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे; राज्य विधान मंडळाने तयार केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे; समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे, स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे; आणि त्यात, समुचित शासनाची **मालकी** असलेला, त्याचे **नियंत्रण** असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला

प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, असा निकाय किंवा अशी अशासकीय संघटना, यांचा समावेश आहे.

राज्य सरकारचे नियंत्रण अथवा सरकारकडून थेट अथवा अप्रत्यक्ष मदत मिळणाऱ्या संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू आहे. यामधील कलम २ (ज) मध्ये सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ स्पष्ट करताना ***राज्यघटनेप्रमाणे, तसेच संसदेने केलेल्या कायद्याप्रमाणे अथवा राज्य सरकारी कायद्याप्रमाणे अस्तित्त्वात आलेली यंत्रणा*** असा अर्थ स्पष्ट केलेला आहे. ज्या यंत्रणेवर सरकारचे नियंत्रण आहे व तिला पुरेसे सहाय्य दिलेले असेल, अथवा बिगर सरकारी संघटना जिला भरीव आर्थिक मदत दिली असेल ती **सार्वजनिक प्राधिकरण** या व्याख्येत बसते.

यामधील भरीव आर्थिक मदत (Substantial Finance) व नियंत्रण या शब्दांच्या व्याख्या कायद्यात आढळत नाहीत. तथापी प्रत्येक प्रकरणामध्ये या कायद्यातील **सार्वजनिक प्राधिकरण** या संज्ञेची व्याख्या व कायद्याचे उद्देश यातील निकष लावून निर्णय घेणे उचित ठरते. या बाबत आता वेगवेगळ्या न्यायालयांचे बरेच निर्णय आलेले आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियम हा केंद्रीय कायदा असल्यामुळे, तो केंद्र शासन व राज्यशासन या दोघांनाही समान रूपात लागू होतो. परंतु या कायद्यातील कलम २७ नुसार समुचित शासनाला म्हणजे राज्याच्या बाबतीत राज्य शासनाला व केंद्र शासनाचे नियंत्रणाखालील सार्वजनिक प्राधिकरणांचे कार्यक्षेत्रात केंद्र शासनाला या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी माहिती व अपील अर्जाच्या शुल्काची किंमत तसेच माहितीचे वाढीव शुल्क (उदाहरणार्थ ए-३, ए-४ पृष्ठाचे शुल्क रू. २/-इत्यादी.) ठरवण्यासाठी नियम करण्याचा अधिकार आहे. केंद्रीय जन माहिती अधिकारी / राज्य जन माहिती अधिकारी यांच्याऐवजी 'जन माहिती अधिकारी' अशी संज्ञा या पुस्तकात वापरली आहे. त्याचप्रमाणे

केंद्रीय साहाय्यक जन माहिती अधिकारी / राज्य साहाय्यक जन माहिती अधिकारी यांऐवजी ‘ साहाय्यक जन माहिती अधिकारी’ या संज्ञेचा वापर करण्यात आला आहे. केंद्रीय माहिती आयोग / राज्य माहिती आयोग यांच्या ऐवजी फक्त ‘माहिती आयोग’ ही संज्ञा वापरली आहे.

मात्र, जिथे केंद्रीय जन माहिती अधिकारी / केंद्रीय माहिती आयोग याच संज्ञा वापरण्याची आवश्यकता आहे, तिथे त्या तशाच वापरण्यात आल्या आहेत. विभागीय (डिपार्टमेंटल) अपिलीय प्राधिकारी याऐवजी ‘प्रथम अपिलीय प्राधिकारी‘ ही संज्ञा वापरण्यात आली आहे. कारण प्रथम अपील त्या अधिकाऱ्याकडे सादर केले जाते.

जन माहिती अधिकारी

सार्वजनिक प्राधिकरणे त्यांच्या काही अधिकाऱ्यांना जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करतात. माहितीचा अधिकार अधिनियमान्वये, विनंती अर्ज दाखल करणाऱ्या व्यक्तीस, माहिती देणे ही या अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे.

साहाय्यक जन माहिती अधिकारी

साहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांचे पदनिर्देशन उप विभागीय, उप– जिल्हास्तरावर असतात व त्यांच्याकडे एखाद्या व्यक्तीला माहिती अधिकाराचा अर्ज किंवा अपिलासंबंधीचा अर्ज देता येईल. असा अर्ज अथवा अपील, हे अधिकारी सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकाऱ्याकडे किंवा संबंधित अपिलीय प्राधिकाऱ्याकडे पाठवतील. मात्र माहिती पुरविण्याची कुठलीही जबाबदारी साहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यावर नाही.

भारतीय डाक विभागाकडून विविध मुख्य डाक–घराचे अधिका-यांना भारत सरकारच्या अधिक्षेत्रातील बहुतांशी सार्वजनिक प्राधिकरणांचे साहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे.

● महाराष्ट्र राज्याच्या शासकीय कार्यालयांसाठी अशा प्रकारची सुविधा उपलब्ध नाही.

माहितीचा अधिकार

कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, नागरिकाला आहे. या अधिकारामध्ये एखादे काम, अभिलेख व दस्तऐवजांची पाहणी; अभिलेख व दस्तऐवजांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे; सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे यांचा समावेश होतो. मात्र, इथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली अणि प्रत्यक्ष अस्तित्वात असलेली माहितीच, या अधिनियमाद्वारे मिळू शकते. जन माहिती अधिकाऱ्याने नवीन माहिती तयार करणे, किंवा तिचे स्पष्टीकरण (विश्लेषण) करणे किंवा अर्जदाराने उपस्थित केलेल्या समस्यांवर उत्तरे शोधणे, जर– तर स्वरूपाच्या प्रश्नांची उत्तरे देणे हे कुठल्याही प्रकारे अपेक्षित नाही.

हा अधिनियम नागरिकांना संसद व राज्य विधानमंडळांच्या सदस्यांच्या बरोबरीने माहितीचा अधिकार प्राप्त करून देतो. या अधिनियमाद्वारे जी माहिती संसद व राज्य विधानमंडळांच्या सदस्यांना देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही.

डिस्केट्स, फ्लॉपी, टेप, व्हीडिओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल, जी ई–मेलद्वारे पाठवता येईल किंवा डिस्केटस्‌मध्ये देता येईल, त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंटआऊट) मार्फत माहिती मिळविण्याचा अधिकार नागरिकाला आहे.

जर माहिती ही विशिष्ट स्वरूपात पुरवताना सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास किंवा प्रस्तुत अभिलेख सुरक्षित ठेवण्याच्या किंवा जतन करण्याच्या दृष्टीने ते हानीकारक नसल्यास, सामान्यत: ज्या स्वरूपात माहिती आहे, त्याच स्वरूपात ती अर्जदाराला पुरवली गेली पाहिजे.

काही प्रकरणामध्ये, अर्जदार हे जन माहिती अधिकाऱ्याकडे, ज्या स्वरूपात माहिती मागितली आहे, त्याच स्वरूपात ती मिळावी अशी अपेक्षा करतात. ही अपेक्षा करताना अर्जदार असा युक्तिवाद करतात की, ज्या नमुन्यात त्यांनी माहिती मागितली आहे, त्याच नमुन्यात त्यांना माहिती मिळण्याचा अधिकार आहे. इथे एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, कायद्यातील तरतुदीनुसार जर माहिती ही छायांकित (झेरॉक्स) प्रतींच्या स्वरूपात असेल तर ती माहिती छायांकित (झेरॉक्स) प्रतींच्या स्वरूपातच दिली पाहिजे, किंवा ती माहिती जर फ्लॉपीच्या स्वरूपात असेल तर, कायद्यातील अटींप्रमाणे त्याच स्वरूपात दिली पाहिजे. जन माहिती अधिकाऱ्याने नवीन माहिती तयार करणे अपेक्षित नाही. या मताला, कायद्यातील 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या बळकटी प्राप्त करून देते. या व्याख्येनुसार माहितीचा अधिकार म्हणजे डिस्‌केट्स, फ्लॉपी, टेप, व्हीडिओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल, त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंटआऊट) मार्फत माहिती मिळविणे यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो. या अधिनियमात सर्वत्र उल्लेख केलेला 'फॉर्म' (Form)अथवा 'नमुना' हा शब्द वरील अर्थ सूचित करतो.

काही नागरिकांना जन माहिती अधिकाऱ्यांकडून कागदपत्रातील निवडक माहितीचा सारांश हवा असतो. नागरिकाला कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली माहिती किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले साहित्य (Material) मिळण्याचा अधिकार आहे. तथापि

हा अधिनियम, जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध माहितीवरून निष्कर्ष काढावेत व हा निष्कर्ष नागरिकाला पुरविणे आवश्यक मानत नाही. याचा अर्थ असा की, सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात ज्या स्वरूपात साहित्य (Material) आहे, त्याच स्वरूपात जन माहिती अधिकाऱ्याने पुरविणे अपेक्षित आहे. परंतु जन माहिती अधिकाऱ्याने नागरिकांच्या वतीने संशोधन करून, साहित्यातून(Material) काही निष्कर्ष काढून नागरिकाला माहिती पुरविणे अपेक्षित नाही.

मंत्रीमंडळ बैठकीची कागदपत्रे

माहितीचा अधिकार कायद्यामधील कलम ८ (झ) मधील तरतूदींन्वये मंत्रीमंडळाशी संबंधित कागदपत्रे देण्यास माहिती अधिकारात सूट देण्यात आली आहे. मंत्रीमंडळात सादर होणारे विषय व त्यावर होणारी चर्चा व त्या अनुषंगाने होणारे इतिवृत्त याला या अधिनियमात संरक्षण देण्यात आले आहे. मात्र मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जेव्हा संबंधित विभागाकडून आदेश काढण्यात येतात ते आदेश व त्यावरील कारणमीमांसा संबंधित आदेशात नमूद करून, ज्याला सर्वसाधारण कार्यप्रणालीत शासननिर्णय असे संबोधिले जाते अथवा शासन आदेश संबोधिले जाते ते मात्र जनतेसाठी उपलब्ध होऊ शकते अशी तरतूद अधिनियमाच्या कलम ८ च्या परंतुकामध्ये करण्यात आली आहे.

ही तरतूद राज्यघटनेमध्ये नमूद असलेल्या विशिष्ट तरतूदीच्या आधारे करण्यात आलेली आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद १६६ (३) अन्वये मा. राज्यपालांना शासनाचा कार्यव्यवहार कोणत्या पध्दतीने करावा याबाबत शासन कार्यनियमावली करण्याचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे जी कार्यनियमावली तयार करण्यात आलेली आहे, त्यामधील भाग २ (सर्वसाधारण) मधील सूचना क्रमांक ३० प्रमाणे सुध्दा मंत्रीमंडळाची कागदपत्रे ही गुप्त स्वरूपाची असतील, असे स्पष्ट केले आहे. ही सूचना राज्यघटनेच्या कलम १६६

अन्वये असल्याने, या घटनादत्त तरतुदीच्या आधारेसुध्दा मंत्रीमंडळाची कागदपत्रे देणे बंधनकारक नाही.

भारतीय राज्य घटनेच्या कलम १६४ (३) अन्वये प्रत्येक मंत्र्यांना गोपनीयतेची शपथ घेणे आवश्यक आहे. या गोपनीयतेच्या शपथेचा नमुना भारतीय राज्यघटनेच्या अनुसूची-३ (VI) मध्ये दिला असून मंत्री यांच्यासमोर आलेली कोणतीही माहिती ते मंत्री म्हणून धारण केलेली जबाबदारी पार पाडण्याखेरीज उघड करणार नाही, अशी तरतूद आहे. प्रत्येक मंत्र्यावर हे जे बंधन आहे, ते साहजिकच मंत्रीमंडळाच्या होणाऱ्या सामूहिक चर्चेबाबत व मंत्रीमंडळासमोर येणाऱ्या माहितीबाबतसुध्दा लागू आहे. त्यामुळे भारतीय राज्यघटना व माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (१) (झ) या दोघांची सांगड घालता मंत्रीमंडळाच्या कामकाजविषयक कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे देणे कायद्याने व घटनेनुसार बेकायदेशीर ठरते.
(प्रदीपकुमार माणिक राऊत विरूध्द अपिलीय अधिकारी व उपसचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मुंबई, मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडील अपील क्रमांक २००६/८३/०२ निर्णय).

खाजगीपणाचा अधिकार

प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जीवनाचे खाजगीपण जपण्याचा पूर्ण अधिकार आहे. भारतीय राज्यघटनेच्या २१ व्या कलमात जो जगण्याचा अधिकार नमूद केला आहे. त्या अधिकारात आपल्या जीवनाचे खाजगीपण जपण्याचा अधिकारही समाविष्ट आहे, असे अनेक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने व विविध उच्च न्यायालयांनी घोषित केले आहे. ज्या गोष्टीचा त्याच्या सार्वजनिक बार्बीशी व सार्वजनिक हिताशी संबंध नसतो, त्याची चर्चा आणि प्रसिध्दी करण्याचा कोणालाही अधिकार नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा एकांत, स्वतःचे खाजगी तपशील व माहिती इतरांपासून राखून ठेवणेचा पूर्ण अधिकार असतो. प्रत्येक घराला भिंती असतात, दाराला कुलूप असते, खिडक्यांना झडपा आणि पडदे असतात ते आतील माणसांच्या खाजगीपणाचे बाहेरच्या अनावश्यक हस्तक्षेपापासून

संरक्षण व्हावे यासाठीच. परवानगीशिवाय कुणाच्याही खाजगी बाबीत न डोकावणे हे सुसंस्कृत समाजातील सभ्यतेचे लक्षण मानले जाते.

माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत कलम ८ मध्ये कोणत्या बाबींची माहिती देण्याचे बंधन सार्वजनिक प्राधिकरणावर नाही त्याची यादी दिलेली आहे. कलम ८ (१) (ञ) मधे असे नमुद आहे की जी माहिती खाजगी स्वरूपाची आहे व जीचा सार्वजनिक हिताशी अथवा व्यापक सार्वजनिक जनहिताशी कोणताही संबंध नाही अशी माहिती देता येणार नाही. अनेकदा सार्वजनिक आणि खाजगी हे ठरविणे अडचणीचे होते, कारण यामधील सीमारेषा अत्यंत धूसर आहे. शासनाला कुणाच्याही खाजगीपणावर अतिक्रमण करण्याचा अधिकार नाही. मात्र शासनाकडे दैंनंदिन शासकीय कामकाजाचा भाग म्हणून येणारी प्रत्येक माहिती खाजगी राहू शकत नाही. कारण ती सार्वजनिक कामकाजाचा भाग म्हणून जमा केली जाते तेव्हा ती सार्वजनिक स्वरूपाची माहिती ठरते. असे असले तरी अपवादात्मक माहितीचा काही भाग असा असू शकतो की ज्याचा संबंध सार्वजनिक बाबींशी येत नाही. अशी माहिती मागण्याचा मोह नागरिकांनी टाळला पाहिजे, याचे कारण व्यक्तीला आपले जीवन खाजगी ठेवण्याचा असलेला अधिकार घटनेत नमूद केलेल्या अधिकारातून निर्माण झालेला आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने गोविंद विरूध्द मध्यप्रदेश राज्य या खटल्यात ठरविले. (AIR १९७५ SC १३७८)

इतर अधिनियमांच्या तुलनेत माहिती अधिकार

माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींना अधिभावी परिणाम(ओव्हरराइडिंग इफेक्ट) प्राप्त झाला आहे. त्यामुळे या अधिनियमाच्या तरतुदी, या शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाखेरीज कोणत्याही अन्य कायद्याच्या आधारे अंमलात असणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी अंमलात येतील.

संस्थांना वगैरे माहिती पुरविणे

या अधिनियमाद्वारे केवळ भारतीय नागरिकांनाच माहितीचा अधिकार प्राप्त होतो. या अधिनियमामधील तरतुदींनुसार संघटित संस्था, संघटना, निकाय, स्वयंसेवी संस्था इत्यादी कायदेशीर अर्थाने कृत्रिम व्यक्ती असल्यातरी नागरिक नाहीत, त्यामुळे हा अधिकार त्यांना वापरता येणार नाही. मात्र अशा संस्थांमध्ये कार्यरत असणाऱ्या व भारताचे नागरिकत्व असणाऱ्या एखाद्या कर्मचाऱ्याने जर स्वत:च्या नावाने अशी माहिती मिळवण्याकरीता अर्ज केला तर त्याला / तिला माहिती दिली जाऊ शकते. अशावेळेस, या व्यक्तीने संस्थेच्या पत्त्यावर अशी माहिती मागवली आहे असे गृहीत धरले जाईल.

माहिती मिळविण्याकरिता भरावयाचे शुल्क

सार्वजनिक प्राधिकरणाकडून ज्या व्यक्तीस माहिती मिळवावयाची आहे, त्या व्यक्तीने अर्जासोबत रु. १०/- (दहा रूपये) चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट), अथवा धनादेश (बँकर्स चेक) अथवा इंडियन पोस्टल ऑर्डर जोडावयाची आहे. महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत असे शुल्क कोर्ट फी स्टँपच्या स्वरूपात सुद्धा भरण्याची तरतूद आहे. हा ड्राफ्ट / चेक / पोस्टल ऑर्डर या सार्वजनिक प्राधिकरणाच्या ‘लेखा अधिकारी’ (अकाऊंट ऑफिसर) या नावाने काढावयाचा आहे. या सार्वजनिक प्राधिकरणाच्या लेखा अधिकाऱ्याकडे अथवा साहाय्यक जन माहिती अधिकाऱ्याकडे रोखीनेदेखील हे शुल्क भरता येते. हा अधिकारी अशा रोख रकमेची पोचपावती देईल.

- स्पष्टीकरण : भारतीय पोस्टल ऑर्डर, केवळ केंद्र शासनाच्या कार्यालयांना अथवा ज्या राज्यांनी त्यांच्या नियमामध्ये पोस्टल ऑर्डरचा उल्लेख केला आहे, त्या राज्यांच्या कार्यालयामध्ये माहितीच्या अधिकाराचा अर्ज करताना पोस्टल ऑर्डर जोडावयची आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील शुल्क व आकारणी

संबंधी नियमांमध्ये पोस्टल ऑर्डरचा उल्लेख नाही, त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या शासकीय कार्यालयात माहितीच्या अधिकारावरील अर्जाचे शुल्क पोस्टल ऑर्डरद्वारे भरता येणार नाही.)

अशी माहिती मिळविण्याची किंमत म्हणून नागरिकाला अतिरीक्त शुल्क (जादा फी) भरावे लागेल. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील शुल्क व आकारणी संबंधी नियमानुसार, जन माहिती अधिकारी अर्जदाराला शुल्काविषयी कळवेल. या नियमांना अनुसरून खालीलप्रमाणे आकारणी करण्यात यावी.

१. ए–४ किंवा ए–३ आकाराच्या प्रत्येक तयार केलेल्या पृष्ठासाठी किंवा फोटोकॉपीच्या प्रतीसाठी प्रत्येकी रु. २/–;

२. यापेक्षा मोठ्या आकाराच्या कागदासाठी प्रत्यक्ष मूळ किंमत अथवा कॉपी तयार करण्यासाठी आलेला प्रत्यक्ष आलेला खर्च;

३. वस्तूंचे नमुने अथवा प्रारूपे (मॉडेल) हवे असल्यास, त्या करावयासाठी प्रत्यक्षात येणारा खर्च अथवा मूळ दर्शनी किंमत;

४. फ्लॉपी अथवा डिस्कवर माहिती घेतल्यास, प्रती डिस्क / प्रती फ्लॉपी रु. ५०/–; आणि

५. छापील स्वरूपात उपलब्ध असलेल्या माहितीकरीता, अशा प्रकाशनाची निश्चित करण्यात आलेली किंमत किंवा अशा प्रकाशनातील सारांशाच्या फोटोकॉपीसाठी, प्रत्येक पानाकरीता रू. दोन मात्र.

६. माहिती अधिकारांतर्गत प्रत्येक नागरिकाला, सार्वजनिक प्राधिकरणाच्या कागदपत्रांची(रेकॉर्ड–अभिलेख) पाहणी करण्याचा अधिकार आहे. कागदपत्रांची अशी

पाहणी करण्याकरीता, सार्वजनिक प्राधिकरण पहिल्या तासासाठी (घड्याळी तास) कुठलीही आकारणी करणार नाही. मात्र त्यानंतरच्या प्रत्येक तासाकरीता किंवा काही मिनिटांकरीता प्रत्येकी रु. ५/- (पाच रुपये मात्र) आकारणी पडेल. (महाराष्ट्रात प्रत्येक १५ मिनिटे किंवा त्याच्या भागाकरीता रू. ५ असे तपासणी शुल्क आकारले जाते.)

७. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील शुल्क व आकारणी संबंधी नियम देखील वरीलप्रमाणेच आहेत. नागरिकाला अतिरीक्त शुल्क (जादा फी), पोचपावती घेऊन रोख स्वरूपात, धनाकर्ष (डी. डी.), बँकर्स चेक अथवा मनी ऑर्डर याद्वारे भरता येते.

अर्जदार जर दारिद्र्य रेषेखालील असेल तर कुठल्याही प्रकारचे शुल्क त्याला भरावे लागणार नाही. मात्र, त्याला दारिद्र्यरेषेखाली असण्याचा पुरावा सादर करावा लागेल. या अर्जासोबत दहा रूपयाचे विहित शुल्क जोडले नाही अथवा दारिद्र्यरेषेखाली असल्याचा पुरावा जोडला नसेल तर, तो अर्ज या अधिनियमाद्वारे बाद करण्यात येईल. अशा अर्जदारांना माहिती देण्याचे कुठलेही बंधन सार्वजनिक प्राधिकरणावर नाही. अशा प्रकरणात अधिनियमातील तरतुदी लागू होणार नाहीत.

- **स्पष्टीकरण** : महाराष्ट्रामध्ये दारिद्रय रेषेखालील व्यक्तीला विनंती अर्जासोबत त्याचे वास्तव्य असलेल्या महानगरपालिका/ नगरपरिषद/नगरपंचायत/ ग्राम पंचायत यांच्याकडे दारिद्रय रेषेखालील असलेल्या व्यक्तींच्या यादीत त्याचे नाव असल्याचे संबंधितांकडून घेण्यात आलेले प्रमाणपत्र किंवा पिवळ्या रंगाची शिधा वाटप पत्रिकेची **साक्षांकित प्रत** जोडणे आवश्यक आहे. (संदर्भ : शासन आदेश क्रमांक : केमाअ-२००६/प्र.क्र.७/०६/पाच, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई -३२, दिनांक २०.०६.२००६)

अर्जाचा विहित नमुना

अर्ज करण्यासाठी कठल्याही प्रकारच्या विहित नमुना नाही. साध्या कोऱ्या कागदावर अर्ज करता येतो. मात्र प्रत्येक अर्जावर अर्जदाराचे नाव व संपूर्ण पत्ता असलाच पाहिजे. जर माहिती इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मागितली असेल तर, त्याच्यावरही अर्जदाराचे संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता असलाच पाहिजे.

- **स्पष्टीकरण** : महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील शुल्क व आकारणी संबंधी नियमांमधील, नियम ३ नुसार माहितीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना म्हणून जोडपत्र ''अ'' दिलेले आहे. तर नियम ५ (१) व ५ (२) नुसार, अनुक्रमे प्रथम अपिलासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व द्वितीय अपिलासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना म्हणून जोडपत्र ''ब'' दिलेले आहे.

माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद

या अधिनियमातील कलम (८) च्या पोटकलम (१) व कलम (९) मध्ये माहिती प्रकट करण्याचे अपवाद दिले आहेत. मात्र कलम ८ मधील पोटकलम (२) नुसार, शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ किंवा वरील अधिनियमातील कलम ८ मधील पोटकलम (१) नुसार अनुज्ञेय असलेले कोणतेही अपवाद यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, माहिती प्रकट केल्याने साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधास होणाऱ्या हानीपेक्षा अधिक असेल, तर सार्वजनिक प्राधिकरण, ती माहिती पाहण्यास परवानगी देऊ शकेल.

सर्वसाधारणपणे, या अधिनियमामधील कलम (८) मधील पोटकलम (१) च्या तरतुदी, माहिती प्रकट करण्यास अपवाद करतात. मात्र माहिती ज्या घटनेशी संबंधित आहे ती घटना, माहिती मागितल्याच्या दिनांकापासून वीस वर्षापूर्वी झाली असेल, तर अशी माहिती अर्जदाराला पुरविण्यात येईल. मात्र खालील बाबींमध्ये २० वर्षांचा काळ उलटून गेल्यावर

देखील ती माहिती नागरिकांना देणे बंधनकारक राहणार नाही. (१) जी माहिती प्रकट केल्याने भारताच्या सार्वभौमत्वाला किंवा एकात्मतेला, राज्याच्या सुरक्षेला, युद्धतंत्रविषयक, वैज्ञानिक किंवा आर्थिक हितसंबंधांना, परकीय राज्यांबरोबरच्या संबंधांना बाधा पोहोचेल किंवा अपराधाला चिथावणी मिळेल, अशी माहिती; (२) जी माहिती प्रकट केल्याने संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या विशेषाधिकारांचा भंग होईल, अशी माहिती; (३) या अधिनियमातील कलम (८) च्या पोटकलम (१)(क) मधील तरतुदींना अधीन राहून मंत्रीमंडळाची कागदपत्रे तसेच मंत्रीपरिषद, सचिव व इतर अधिकारी यांच्या विचारविमर्शाचे अभिलेख, अशी माहिती.

अभिलेख जतन करण्याचा कालावधी व कायदा

अमर्यादित कालावधीकरिता अभिलेख जतन केला जावा, हे या अधिनियमांतर्गत अपेक्षित नाही. संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या अभिलेख जतन करण्याच्या कालावधीनुसार, हा अभिलेख सांभाळण्यात यावा. अभिलेख जतन करण्याचा कालावधी संपल्यामुळे, अभिलेख अथवा फाईल नष्ट केल्यानंतरदेखील, माहितीचा स्त्रोत असलेली फाईल, पत्राच्या किंवा OM च्या किंवा इतर स्वरूपात अस्तित्वात राहू शकते. कलम ८ (१) नुसार जी माहिती प्रकट करण्यास अपवाद करण्यात आली आहे, ती माहिती देखील कलम ८ (३) नुसार वीस वर्षानंतर खुली करणे आवश्यक आहे, जेणे करून माहिती उपलब्ध होऊ शकेल.

अर्जदाराला मिळणारी मदत

जर माहितीची मागणी करणारी व्यक्ती लिखित स्वरूपात अर्ज करण्यास सक्षम नसेल, तर ती व्यक्ती जन माहिती अधिकाऱ्याची मदत घेऊ शकते. जन माहिती अधिकाऱ्याने योग्य ते सहकार्य करणे बंधनकारक आहे. एखादी व्यक्ती ज्ञानेंद्रियाच्या दृष्टीने विकलांग असेल तर जन

माहिती अधिकारी माहिती मिळण्यास साहाय्यभूत होईल असे साहाय्य देईल; तसेच पाहाणी करण्यासाठी उचित असे साहाय्य देईल.

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न–६ :

१. माहिती या व्याख्येत खाजगी निकायाशी (प्राईव्हेट बॉडी) संबंधित माहिती मिळवता येते का ? येत असेल तर त्याची प्रक्रिया काय आहे?

२. सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत समावेश होऊ शकणाऱ्या शासकीय कार्यालयांची तुम्हास माहित असलेली काही नावे सांगा.

३. माहितीचा अधिकार कायद्यानुसार स्थापन करण्यात आलेली त्रिस्तरीय रचना सांगा.

४. जन माहिती अधिकारी व साहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांचे पदनिर्देश कोण करते?

५. साहाय्यक जन माहिती अधिकारी हा जन माहिती अधिकाऱ्याचा साहाय्यक आहे की नागरिकांचा याविषयी कायद्यातील तरतुदींच्या अनुषंगाने आपले मत सांगा.

६. ऑफिशिअल सिक्रेट ॲक्ट, १९२३ च्या तुलनेत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ला वरचढपणा प्राप्त झाला आहे, असे तुम्हाला वाटते का?

७. माहितीचा अधिकार अधिनियमानुसार कोणाला माहितीचा अधिकार प्राप्त होतो?

माहिती मिळविण्यासाठी लागणारा कालावधी

सामान्यत: सार्वजनिक प्राधिकरणाला, माहिती मिळण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यावर, विनंती केल्यापासून तीस दिवसाच्या आत अर्जदाराला माहिती दिली जाईल. परंतु जर मागितलेली माहिती, एखाद्या व्यक्तीचे जीवित व स्वातंत्र्य यासंबंधातील असेल, तर विनंतीचा अर्ज मिळाल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत ती देण्यात येईल. मात्र असा अर्ज जर साहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यामार्फत पाठवला असेल किंवा चुकीच्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे पाठवला असेल तर मात्र वरील ३० दिवस किंवा ४८ तास या कालावधीमध्ये आणखी ५ दिवसांचा कालावधी मिळवण्यात येईल. 'जन माहिती अधिकाऱ्यांसाठी' या प्रकरणात याविषयीची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

स्वयंअध्ययनासाठी प्रश्न–७:

१. महाराष्ट्रामध्ये माहितीच्या अर्जासोबतचे शुल्क कोणकोणत्या प्रकारे भरता येते, ते सांगा.

२. महाराष्ट्रामध्ये माहिती मिळविण्याची किंमत म्हणून नागरिकाला अतिरीक्त शुल्क (जादा फी) कोणकोणत्या प्रकारे भरता येते, ते सांगा.

३. दारिद्रयरेषेखालील नागरिकाला शासकीय कार्यालयातील अभिलेखांची पाहाणी (इन्सपेक्क्षन) करायची असल्यास, अर्जासोबत कोणता पुरावा जोडायचा आहे?

४. एखाद्या नागरिकाने माहिती मिळवण्याचा अर्ज जर साहाय्यक जन माहिती अधिकाऱ्याकडे सोपविला तर त्याला माहिती मिळण्यासाठी किती दिवस लागतील?

५. कोणत्या कलमांमधील माहिती नागरिकाला देणे बंधनकारक नाही?

६. माहितीचा अधिकार अधिनियमामधील कलम (८) (१) नुसार, अपवाद करण्यात आलेली माहिती, नागरिकाला द्यायची असेल तर कोणते निकष लावावे लागतील?

अपील

जर एखाद्या अर्जदाराला विहित कालावधीमध्ये, म्हणजेच ३० दिवस किंवा ४८ तासांमध्ये माहिती मिळाली नाही किंवा त्याला प्राप्त झालेल्या माहितीबद्दल अर्जदार समाधानी नसेल, तर तो प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज करू शकतो. असा प्रथम अपिलीय प्राधिकारी हा त्या खात्यामधील जन माहिती अधिकाऱ्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा अधिकारी असेल. हे अपील, अर्ज केल्यानंतर ३० दिवसाची मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत करता येईल. प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने असे अपील प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आणि अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवसांच्या आत अपील निकाली काढणे अपेक्षित आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी विहित कालावधीमध्ये, प्रथम अपिलाबाबत निर्णय देण्यात अयशस्वी ठरला तर किंवा प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयामुळे अर्जदाराचे समाधान नाही झाले तर, असा अर्जदार ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, माहिती आयोगाकडे दुसरे अपील करू शकतो.

तक्रारी

या अधिनियमानुसार संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने कोणताही असा अधिकारी नियुक्त केला नाही, या कारणास्तव किंवा यथास्थिती, साहाय्यक जन माहिती अधिकाऱ्याने माहितीसाठीचा किंवा अपिलासाठीचा अर्ज जन माहिती अधिकाऱ्याकडे किंवा अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अग्रेषित करण्यासाठी स्वीकारण्यास नकार दिला असल्याच्या कारणास्तव यथास्थिती, किंवा या अधिनियमान्वये मागणी करण्यात आलेली कोणतीही माहिती मिळण्यास

नकार मिळालेली व्यक्ती; या अधिनियमान्वये मागितलेल्या माहितीस किंवा माहिती पाहण्यासाठी केलेल्या मागणीस विनिर्दिष्ट मुदतीत प्रतिसाद न मिळालेली व्यक्ती; अवाजवी वाटत असलेली फी भरण्यास जिला भाग पाडण्यात आले असेल अशी व्यक्ती किंवा या अधिनियमान्वये, आपल्याला अपुरी, दिशाभूल करणारी किंवा खोटी माहिती देण्यात आली असे जिला वाटत असेल अशी व्यक्ती माहिती आयोगाकडे तक्रार करू शकते.

केंद्रीय माहिती आयोगामार्फत अपील व तक्रारींचे निवारण

केंद्रीय माहिती आयोग त्यांच्या समोर आलेल्या अपिलांवर व तक्रारींवर विचारविनिमय करून त्यांचा निर्णय, अपीलकर्त्यास/तक्रारकर्त्यास आणि प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यास / जन माहिती अधिकाऱ्यास कळवेल. अपील / तक्रारींचे निवारण करण्यासाठी माहिती आयोग अपील/ तक्रार करणारे व विरुद्ध पक्ष या दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेईल किंवा अपील / तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी अथवा सार्वजनिक प्राधिकरणाचे तत्सम वरिष्ठ अधिकारी, ज्यांनी प्रथम अपिलाचा निर्णय दिला आहे, यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास करेल. सादर केलेल्या अपिलाच्या / तक्रारीच्या संदर्भात सुनावणी घ्यायचे माहिती आयोगाने ठरविले तर, अशा सुनावणीची तारीख, किमान सात दिवस आधी संबंधित व्यक्तींना आयोगाकडून कळवली जाईल. अपीलकर्त्याला / तक्रारकर्त्याला या सुनावणीच्या वेळेस स्वत: हजर रहायचे की आपल्या अधिकृत प्रतिनिधीला या सुनावणीसाठी पाठवायचे हे ठरवण्याचा अधिकार त्याला आहे.

त्रयस्थ पक्षाला द्यावयाची माहिती

या अधिनियमान्वये त्रयस्थ पक्ष याचा अर्थ, माहिती मिळण्याची विनंती करणारी नागरिकांव्यतिरीक्त अन्य एखादी व्यक्ती, असा आहे आणि त्यात सार्वजनिक प्राधिकरणाचा

समावेश होतो. त्रयस्थ पक्षाच्या व्याख्येमध्ये माहिती मिळण्याची विनंती केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाव्यतिरीक्त अन्य सार्वजनिक प्राधिकरणाचाही समावेश होतो.

त्रयस्थ व्यक्तीला द्यावयाच्या माहितीचे प्रकटीकरण

वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता, व्यावसायिक गुपिते किंवा बौध्दिक संपदा यांचा समावेश असलेली माहिती प्रकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल अशी माहिती, ही प्रकट करण्यास अपवाद ठरते. मात्र अशी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर अशी माहिती प्रकट करावी.

जर अर्जदाराने मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असेल किंवा त्यांच्याकडून पुरविण्यात आलेली असेल आणि त्रयस्थ पक्ष ही माहिती गोपनीय ठेवू इच्छित असल्यास, जन माहिती अधिकारी अशी माहिती प्रकट करायची की नाही याबाबत जन माहिती अधिकारी निर्णय घेईल. अशा प्रकरणात मार्गदर्शक तत्त्व म्हणजे कायद्याने संरक्षण दिलेल्या व्यावसायिक किंवा वाणिज्यिक गुपितांच्या बाबतीत असेल ते खेरीज करून जर लोकहितार्थ अशी माहिती प्रकट करणे, हे अशा त्रयस्थ पक्षाच्या हिताला होणारी कोणतीही संभाव्य हानी किंवा क्षती यापेक्षा अधिक महत्त्वाची असेल, तर ती माहिती प्रकट करण्याची परवानगी देता येईल. मात्र अशी माहिती प्रकट करण्याअगोदर जन माहिती अधिकाऱ्याला खालील कार्यपद्धतीचा अवलंब करावा लागेल.

जन माहिती अधिकाऱ्याला त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती प्रकट करायची असेल तर, तो अशी विनंती करण्यात आल्यापासून पाच दिवसांच्या आत त्या विनंतीबाबत आणि ती माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग प्रकट करण्यासाठी इच्छुक असल्याबाबत लेखी नोटीस त्रयस्थ पक्षास देईल आणि त्रयस्थ पक्षाला अशी माहिती प्रकट करावी किंवा कसे, या

संबंधात लेखी किंवा मौखिक निवेदन सादर करण्यासाठी, आमंत्रित करील. अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत प्रस्तावित माहिती प्रकट करण्याविषयी निवेदन करण्याची त्रयस्थ पक्षास संधी देण्यात येईल.

जन माहिती अधिकारी कोणताही निर्णय घेण्यापूर्वी त्रयस्थ पक्षाने केलेले निवेदन विचारात घेऊन, माहितीच्या प्रकटीकरणाचा निर्णय घेईल. हा निर्णय विनंतीचा अर्ज मिळाल्यानंतर चाळीस दिवसांच्या आत घेण्यात येईल. असा निर्णय घेतल्यानंतर जन माहिती अधिकारी त्याच्या निर्णयाची लेखी नोटीस त्रयस्थ पक्षास देईल. या नोटीशीत ज्याला नोटीस देण्यात आली असेल, असा त्रयस्थ पक्ष त्या निर्णयाविरूद्ध कलम १९ अन्वये अपील दाखल करण्यास हक्कदार असेल या विधानाचा समावेश असेल.

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुद्ध, संबंधित त्रयस्थ पक्षाद्वारे करावयाचे अपील हे आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे करण्यात येईल. प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाने व्यथित झाला असल्यास, त्रयस्थ पक्ष माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करू शकतो.

त्रयस्थ पक्षाची माहिती प्रकट करण्याच्या जन माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध त्रयस्थ पक्षाने अपील दाखल केले असल्यास, जन माहिती अधिकाऱ्याला अपिलाचा निर्णय होईपर्यंत माहिती प्रकट करता येणार नाही.

स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न ८ :

१. सर्वसाधारण परिस्थितीत, प्रथम अपिलीय प्राधिकरणाने किती दिवसात अर्ज निकाली काढणे अपेक्षित आहे.

२. समजा नागरिकाने मागितलेली माहिती त्याच्या जीवित व स्वातंत्र्याशी संबंधित असल्यामुळे ती जन माहिती अधिकाऱ्याला ४८ तासांच्या आत देणे भाग आहे. परंतु जन माहिती अधिकाऱ्याने पुरविलेल्या माहितीमुळे नागरिकाने व्यथित होऊन प्रथम अपील केले तर प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने ते किती दिवसात निकाली काढणे कायद्याला अपेक्षित आहे?

३. नागरिकाने द्वितीय अपील माहिती आयोगाकडे ९० दिवसात केल्यानंतर माहिती आयुक्तांनी त्यावर किती दिवसात निर्णय देणे अपेक्षित आहे?

४. नागरिक माहिती आयुक्तांकडे तक्रार कोणकोणत्या कारणावरून करू शकतो, याची यादी करा.

५. त्रयस्थ पक्ष म्हणजे काय? त्रयस्थपक्षाची माहिती पुरविण्याची कार्यपद्धतीचे वर्णन करा.

६. अर्जदाराने माहिती विशिष्ट तक्यात भरून मागितली असल्यास, जन माहिती अधिकाऱ्याची भूमिका काय असली पाहिजे असे तुम्हाला वाटते, ते थोडक्यात लिहा.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ : यशदा प्रकाशने





















अधिक माहितीसाठी संपर्क

सार्वजनिक धोरण केंद्र, यशदा

दूरध्वनी : (०२०) २५६०८२१६